**माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट् राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११९१८/अपील-४१/०२**

**श्री. जमनादास भ.बारीया,** ------ **अपीलकर्ता**
**५३/१६७४, ोहरु ागर, आकाशदिप सोसायटी,**
**कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपाबिंधक सहकारी संस्था, मुंबई,**
**गृहार्मिाण क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहार्मिाण भवा, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई- ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपाबिंधक सहकारी संस्था, मुंबई,** ------**उत्तरवादी**
**गृहनिार्माण क्षेत्रविकास मंडळ, मुंबई,**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई- ४०० ०५१.**

.

## <u>वि वे च न</u>

श्री. जमनादास म.बारीया याांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६, पोटकलम (१) नुसार सभासदाचे हितरक्षण होण्यासाठी व पुढील कार्यवाही दक्षता घेण्यासाठी नेहरुनगर आकाशदीप को.ऑप.हौ.सो.लि. या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दि.२४.५.२००५, ८.१.२००६ व दि.२६.२.२००६ च्या इतिवृत्ताची प्रत तसेच कार्यकारी मंडळाच्या सभेचे एप्रिल, २००५ ते ऑागस्ट,२००६ च्या इतिवृत्ताची प्रत व या कालावधीचा जमा खर्च व आय व्यय ताळेंबंद पत्राच्या अहवालाच्या सर्व प्रती मिळण्याबाबत दि.२५.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था यांचेकडे अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था यांनी अधिनियम,२००५ अन्वये मागितलेली माहिती संस्था पातळीवरील असल्याने ती अर्जदारास १५ दिवसात द्यावी असे आकाशदिप को.ऑप.हौ.सो. च्या चेअरमन/ सेक्रेटरींाा दि. १९.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले होते.

संस्थेने अर्जदारास माहिती दिली नसल्याने मुख्याधिकारी, मुंबई मंडळ यांचेकडे दि. १७.१०.२००६ रोजी माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५, कलम १९, पोटकलम (१) अन्वये प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील केले. उप निाबंधक सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये आकशदिप को.ऑप.हौ.सो.लि.चे सभासद व अपिलार्थी यांाी मागितलेली माहिती १५ दिवसात देणेबाबत दि.१७.११.२००६ अन्वये संस्थेचे चेअरमन/ सेक्रेटरींना निार्देश दिले आहेत. संस्थेने अपिलकारास आवश्यक माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ पोटकलम (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि. २२.४.२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केली होती. पोस्टातून यु.पी.सी.ने सुनावणीस हजर रहाणेबाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप निाबंधक सहकारी संस्था तसेच अपिलकारास पत्र पाठविण्यांत आले होते. परंतु, सुनावणीकरिता दोघेही हजर झाले नाहीत.

कागदपत्राची तपासणी केली असता प्रथम अपिलीय अधिका-यांच्या निर्देशासार संस्थेने अपिलकारास माहिती दिलेली नसल्याने प्रथम अपिलकारास आवश्यक माहिती द्यावी. उप निबंधक सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये दिलेल्या निार्देशाचा संस्थेने भंग केला असल्याने सदर अधिनायमातील तरतुदीनुसार संस्थेविरुध्द कारवाई करण्यांत यावी. अपिलासंबंधी खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

***<u>आदेश</u>***

**अपील अंशतः मान करण्यांत येत आहे.**

**( रामानांद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई.**

**मुंबई,**
**दिनाांक :-०२/०५/२००८.**

**माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/११६५८/अपील-४२/०२**

श्री. इंदर मोहन खन्ना, ------ **अपीलकर्ता**
ब्लॉक न.१०, फ्लॅट नं.८०,
महेश्वर बिल्डिंग, आर.ए.किडवाई रोड,
वडाळा, मुंबई-४०० ०३१.

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपाबिंधक सहकारी संस्था,
एफ.एन.विभाग मुंबई यांचे कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ.समोर, मुंबई- ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निाबंधक सहकारी संस्था, **-----उत्तरवादी**
एफ.एन.विभाग मुंबई यांचे कार्यालय,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ.समोर, मुंबई- ४०० ००१..

.

**<u>वि वे च न</u>**

श्री. इंदर मोहन खन्ना याांनी मिाहतीचा अधिकार अधिनिायम, २००५ मधील कलम -६, पोटकलम (१) नुसार दि. २८.७.२००६ च्या अर्जान्वये वडाळा महेश्वर को.ऑप.हौ.सोसायटी लि. या संस्थेचा कारभार राज्य शासन/ केंद्र शासाने तयार केलेल्या अधिनियम/ नियमाासार चालत नाही. सदर संस्थेतील गैरकारभाराबाबत सन २००३ पासून दाखल केलेल्या तक्रारीसंबंधी तसेच दि.२६.४.२००६ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देणेबाबत माहिती मागविली आहे.

जन माहिती अधिका-यांनी दिनांक ४.८.२००६ च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती दिली आहे. दिलेली माहिती परिपूर्ण नाही. त्यामुळे अर्जदाराचे समाधान झाले नसल्याने जन माहिती अधिका-यां विरुध्द अर्जदाराने अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले. सदर अपिलावर अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली. सुनावणीच्यावेळी प्रतिवादी जन माहिती अधिकारी तथा सहायक निाबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी अर्जदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ (अ) अंतर्गत आदेश निर्गमित करुन संस्थेच्या दप्तरी कामकाजाची तपासणी सुरु केली आहे. तेव्हा संस्थेच्या तपासणीचे काम चालू असल्याने मागणी अर्जानुसार अर्जदारास आवश्यक माहिती एक महिन्यात उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १३.१०.२००६ रोजी दिला आहे.

प्रथम अपिलीय अधिका-याच्या निर्णयाुसार माहिती मिळाली नसल्याने व्यथित होऊन अपिलकाराने जन माहिती अधिका-यांविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ पोटकलम (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपिलावर दि.२९.४.२००८ रोजी दुपारी ४.०० वाजता सुनावणी झाली. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी श्री.इंदर मोहन खन्ना तसेच जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे दोघेही उपस्थित नव्हते. सदर प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता प्रथम अपिलीय
अधिका-यांच्या दि. १३.१०.२००६ च्या निर्णयाुसार अर्जदारास मागणी केलेली आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा. अपिलावर खालीलप्रमाणे निर्णय देण्यांत येत आहे.

***-निर्णय-***

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई.**

**मुंबई**
**दिनांक :- ०२/०५/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००८/२२२७/०२**

**श्री. अभयचंद्र विनायक सावंत,** **------ अपीलकर्ता**
**१३ शांती तुळशीबाग, टी.एच.कटारीया मार्ग,**
**माटुंगा रोड, मुंबई- ४०० ०१६.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप आयुक्त (परि.२),**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एफ दक्षिण विभाग कार्यालय,**
**परळ नाका, मुंबई-४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मा.आयुक्त, मुंबई महानगरपालिका,**
**सहायक आयुक्त,जी/उत्तर विभाग,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**दादर, मुंबई-४०० ०२८.**

**-----उत्तरवादी**

**वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६(१) अनुसार अपिलकार श्री.अभयचंद्र विनायक सावंत यांनी दाखल केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अपिलकाराचे समाधाान न झाल्यामुळे अपिलकार यांनी कलम १९(३) अन्वये दि. १३.१०.२००६ रोजी दाखल केलेल्या द्वितीय अपिलावर दि. ०१.०४.२००८ रोजी दुपारी १२.३० वाजता सुनावणी आयोजित करण्यांत आली. सदर सुनावणीस अपिलकार, श्री.अभयचंद्र सावंत, जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, जी-उत्तर मुंबई महाागरपालिका कार्यालय, दादर, मुंबई यांच्या वतीने श्रीमती उ.ाि.सलते व श्री.अशोक उघाडे आणि अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परि.२), एफ/दक्षिण विभाग, मुंबई महा-नगरपालिका कार्यालय, परळ नाका, वरळी, मुंबई यांच्या वतीने श्री.वि.ल.कांबळे हे उपस्थित होते.

अपिलकार यांनी प्रतिपादन केले की, शिरोडा सोसायटी संस्थेच्या तक्रार अर्जावर प्रशासकीय अधिकारी वर्गाने केलेले कार्यवाही, नौंदी, टिप्पण, अभिप्राय इत्यादी नोंदी, कार्यालयीन दप्तराची पहाणी याबाबत दि. ८.२.२००५, ३०.८.२००५ व दि. १६.११.२००५ रोजीच्या अर्जान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी माहिती विचारलेली होती. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यासंदर्भात माहिती देण्याबाबत निर्देश देवूनही कोणतीही माहिती देण्यांत आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी प्रतिपादा केले की, अपिलकार यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहिती संदर्भात समक्ष भेटणे आवश्यक होते.

सुनावणीच्या वेळेस केलेले प्रतिपादन व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तीन अर्जासंदर्भात स्वतंत्र जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांना स्वतंत्रपणे निर्देश देणे आवश्यक होते. आयुक्त, महानगरपालिका यांना केलेला अर्ज आयुक्त यांनी संबंधितांकडे पाठविला असून, या संदर्भातील संकलित माहिती अपिलकार यांना देण्यासंदर्भात आवश्यक ती व्यवस्था प्रथम अपिलीय अधिकारी यांनी करणे आवश्यक होते. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी (सहाय्यक पालिका आयुक्त) यांनी अपिलकार यांना एकत्रितरित्या आवश्यक असणारी माहिती देण्याबाबतची व्यवस्था करण्याचे निर्देश देणे योग्य होईल.

पूर्ववर्ती विवेचनाच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

प्रथम अपिलीय अधिकारी याांनी अपिलकार यांना आवश्यक असणारी माहिती एकत्रितरित्या संकलित करुन ती देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच, अपिलकार यांना कार्यालयीन दप्तराची पहाणी करण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास सदरचे दस्तऐवज पहाणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. अपिलकार यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुा देण्यास जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडून अवाजवी विलंब झालेला असल्याने सदरची माहिती व दस्ताऐवज पहाणी अपिलकारांना विनाशुल्क उपलब्ध करुान द्यावी.

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई,**
**दिनांक :०५/०५/२००८.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग , बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१४८/०२**

**श्री.कमलाकर सुखदेव दरवडे,**
**सरचिटणीस महाराष्ट्र ओ.बी.सी. संघ,**
**दरवडे चाळ, व्ही.एस.मार्ग ,**
**सायन चुनाभट्टी , मुंबई-४०० ०२२** **------ अपीलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त**
**अंमलबजावणी अ ४था मजला विक्रीकर भवन**
**माझगांव मुंबई -१०**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त**
**(अन्वेषण) अ ४था मजला विक्रीकर भवन**
**माझगांव मुंबई -१०** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री.कमलाकर सुखदेव दरवडे , मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली दिनांक ७/७/२००६ च्या अर्जान्वये पेट्रोलियम पदार्थाच्या बाबतीत विक्रीकर विभागाकडून देण्यात आलेले जप्तीचे , मुक्ततेचे आदेश , या बाबीशी संबंधित अनुषंगिक माहिती, विक्रीकर खात्यातील अधिका-यांची कार्यप्रणाली , अंमलबजावणी शाखेतील अधिका-यांच्या बदल्या इ.बाबींची माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले .तथापि प्रथम अपीलीय प्राधिका-यांने पारित केलेल्या आदेशानेही समाधान न झाल्याने अपीलकाराने आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले,ज्याची सुनावणी दिनांक२६ मे २००८ रोजी आयोजित करण्यात आली . सदर सुनावणीला अपीलकार,जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते.

उपलब्ध कागदपत्राची तपासणी केली असता व दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिका-यांनी अर्जदाराला त्यांच्या दिनांक ३१/७/२००६ च्या पत्रान्वये माहिती पुरवली आहे.त्यामध्ये काही माहिती संदिग्ध असल्यामुळे तर काही माहिती अधिनियमातील तरतूदीनुसार देता येत नसल्यामुळे जनमाहिती अधिका-यांनी नाकारली आहे व देता येण्याजोगी माहिती अर्जदाराला उपलब्ध करून दिली आहे. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी संदिग्ध माहिती असलेल्या मुद्दयांबाबतची माहिती देता येईल किंवा कसे ही बाब जनमाहिती अधिका-यांनी पुन्हा तपासून पहावी असे आदेशात नमूद केले आहे. त्याखेरीज जनमाहिती अधिका-यांची या संदर्भातील भूमिकेशी सहमत असल्याचे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे.

अपीलकाराने विशिष्ट अशी माहिती मागितलेली नाही. तथापि जनमाहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. विचारलेल्या माहितीचे मोघम स्वरूप पाहता तसेच जनमाहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती दिलेली आहे. हे लक्षात घेता प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगाला आवश्यकता वाटत नाही.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिाांक :-२९/५/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग , बृहन्मुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१०१/०२**

श्री. विश्वास वसंत ताम्हणकर,
पो.ह.ले.क्र.२४३३१/ मुंबई पोलीस दल,
टागोर नगर चाळ क्र.१५६, खोली क्र.२५८५,
ग्रूप क्र.५/ब, विक्रोळी (पूर्व),
मुंबई-४०० ०८३. ------ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था,
मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला,
जी.पी.ओ.समोर, मुंबई- ४०० ००१.

जन माहिती अधिकारी तथा
सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) व पदसिध्द कार्याध्यक्ष,
बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.
मुंबई सशस्त्र पोलीस दल व दंगल नियंत्रण पथक,
नायगांव, मुंबई- ४०० ०१४. -----**उत्तरवादी**

**- वि वे च न -**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम -६ अन्वये श्री.विश्वास वसंत ताम्हणकर यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्याकडे दि. ११.९.२००६ रोजी अर्ज करुन बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पत संस्था मर्या. मुंबई या पत संस्थेत ठेवलेली रक्कम सुरक्षित आहे किंवा कसे व कसूरदारा वर कार्यवाही करण्याबाबत मा.न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबत मागणी केली होती. याबाबत शासकीय माहिती अधिकारी / अपिलीय अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.२७.५.२००८ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्रीमती स्मिता सदानंद गायकवाड तथा सहायक निबंधक

सहकारी संस्था (१) मुंबई शहर, जन माहिती अधिकारी तथा के.एस.शेख, सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) तसेच अपिलकार श्री.विश्वास ताम्हणकर हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रंची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

श्री.विश्वास ताम्हणकर, अपिलकार यांनी माहितीचा अधिकार खाली दि.११.९.२००६ रोजी जन माहिती अधिकरी यांचेकडे अर्ज करुन या पत संस्थेच्या कसूरदारावर कार्यवाही करण्याबाबत मा.न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबत माहिती देण्याबाबत विनंती केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास दि.२२.९.२००६ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती दिली.

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालस जा.क्र.अवनि/केंमाअ/ शा.प्रा.अ./०६, दिनांक ८.२.२००६ च्या पत्रानुसार सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकांना शासनाकडून कोणतेही वित्त सहाय्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने देण्यात येत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा कायदा बृहन्मुंबई पोलीस कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नायगांव, मुंबई या संस्थेला लागू होत नाही.

जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी असे सांगितले की, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही. याबाबत सहकार आयुक्त, सहकार विभाग, महाराष्ट्र शासन व रिझर्व्ह बँक यांचे आदेश आहेत. सदरील पत संस्थेला शासनाचे कोणतेही अर्थसहाय्य दिले जात नाही.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नागरी सहकारी बँक / सहकारी पतसंस्था यांना माहितीचा अधिकार लागू होत नाही असे आयोगाचे मत आहे.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-३१/०५/२००८**

मुख्य महिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र-२००८/अपील-३९/०२

श्री. दयानंद महादेव चौधरी, ------अपीलार्थी
२०४, देवदर्शन, यशवंत नगर,
वाकोला पाईप लाइर्न,
सांताक्रूझ (पूर्व) , मुंबई- ४०० ०५५.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक (आस्थापना) ------उत्तरवादी.
पंचायत समिती कुडाळ,
पोस्ट कुडाळ, तालुका कुडाळ,
जिल्हा- सिंधुदुर्ग .

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक (योजना)
पंचायत समिती कुडाळ,
पोस्ट कुडाळ, तालुका कुडाळ,
जिल्हा- सिंधुदुर्ग .

***---विवेचन---***

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी परिपूर्ण माहिती देण्याबाबत आदेश दिले. परंतु जन माहिती अधिका-यांनी परिपूर्ण माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होउन श्री.दयानंद महादेव चौधरी तथा अपिलार्थी यांनी दि. १४.११.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. सदर अपिलावर दि.२९.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी हजर नव्हते.

कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसते की, अर्जदाराने मौ. वालावल. ता. कुडाळ. जि.सिंधुदुर्ग या ग्रामपंचायतीवर शासन आदेश दि.३.९.२००५ अन्वये फौजदारी गुन्हे घालणेबाबतची दि.२६.७.२००६ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी या अर्जावर अत्यंत त्रोटक स्वरुपाची माहिती दिली. यामुळे अर्जदाराचे समाधान झाले नाही. त्यामुळे अर्जदाराने जन माहिती

अधिका-यांविरुध्द दि.७.९.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक (आस्थापना) पंचायत समिती कुडाळ यांचेकडे अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-याने दि.२५.९.२००६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सुनावणी घेतली. सुनावणीसाठी अपिलार्थी/ जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थीस ३० दिवसांचे आत जन माहिती अधिका-यांनी परिपूर्ण माहिती द्यावी असे आदेश दि.३०.९.२००६ रोजी पारित केले.

प्रथम अपिलीय अधिका-याने परिपूर्ण माहिती अर्जदारास देयाबाबत आदेश पारित करुनही जन माहिती अधिका-याने माहिती दिली नाही. यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. या प्रकरणी असे आदेश देण्यांत येत आहेत की, अपिलार्थी स परिपूर्ण माहिती जन माहिती अधिका-यांनी अद्याप का दिलेली नाही याबाबत आयोगाकडे खुलासा सादर करावा व अपिलकारास ३० दिवसांचे आत मागितलेली माहिती द्यावी.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यांत येत आहे.

( रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, मुंबई

मुंबई ,
दिनांक :-१६.०५.२००८.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-६०/०२**

**श्री. प्रमोद राजाराम पवार,** **------अपीलार्थी**
**१२०/ बी/६०, राजगड,**
**एम.यु.टी.पी. एस.आर.ए.स्कीम,**
**टाटानगर रोड , मानखुर्द ,मुंबई- ४०० ०४३.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी,** **------उत्तरवादी.**
**सह. महानगर आयुक्त,**
**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे -कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

***---विवेचन-***

माहितीचा अधिकारअधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अन्वये अर्जदार श्री.प्रमोद राजाराम पवार यांनी जन माहिती अधिकारी श्री.टी.एस.सावंत, मुबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रा-कुर्ला संकुल, यांचेकडे दि.२८.४.२००६ रोजी अर्ज सादर करुन खालील मुद्दयांवर माहिती मागितली होती.

(१)एम.एम.आर.डी.ए.व स्पार्कने सन २००० ते २००६ पर्यत चेंबूर सांताक्रूझ लिंक रोड प्रकल्पासाठी. राहूल नगर. टिळक नगर चेंबूरचे टेबल मॅप न.८ च्या जुन्या व सुधारित प्रमाणित नकाशाच्या वेगवेगळया अंदाजे ५ प्रती.

(२) प्रकल्पग्रस्तासाठी एम.एम.आर.डी.ए.कडे उपलब्ध असलेल्या वसाहतीची माहिती, तसेच मॅप नं.८ मधील किती प्रकल्पग्रस्तांची कुठे कुठे सोय केली त्याची नावासहित यादी.

(३) वाचनालय, अभ्यासिका, व्यायामशाळा, सेवा सहकारी संस्था, अनाथालये व बालकाश्रम इ. शासनाचे विविध सामाजिक उपक्रम राबतविण्यासाठी प्रकल्पांतर्गत केलेले नियोजन व प्रकल्पांतर्गत बाधित लाभार्थी संख्या.

(४) सामाजिक उपक्रमांसाठी, संस्थांसाठी राखून ठेवलेले भूखंड व लाभार्थीना प्रदान करण्याची कार्यवाहीची पध्दत.

जन माहिती अधिकारी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. २८.४.०६ च्या अर्जास ३० दिवसांच्या आत उत्तर दिले नाही. यामुळे व्यथित होउन अर्जदाराने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये

प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.म्हैसकर, सहायक महानगर आयुक्त, एम.एम.आर.डी.ए.यांचेकडे दि.२८.७.२००६ रोजी अपील दाखल केले. सदर अपिलावर अधिनियमातील कलम १९(६) नुसार ३० दिवसांचे आत किंवा एकूण ४५ दिवसांत अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. कारणे देवून अपील विहित मुदतीत निकालात काढले नाही. यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपिलाची सुनावणी दि.५.५.२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीसाठी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी. श्री.लाठी, प्रकल्प व्यवस्थापक हे हजर होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून उपलब्ध कागदपत्रे तपासली असता जन माहिती अधिका-याने अर्जदारास उत्तर दिले नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झाला आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलाची सुनावणी घेतलेली नाही. विहित कालावधीत अपील निकालात काढले नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम १९(६) चा भंग केला आहे. अर्जदारास विहित वेळेत उत्तर देवून अपिलीय अधिका-याने विहित कालावधीत अपील निकालात काढून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ ची अंमलबजावणी काटेकार पणे करणे आवश्यक आहे. अपिलार्थीच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे ही गंभीर बाब आहे. सबब प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला हे आदेश प्राप्त झाल्या पासून १५ दिवसांचे आत माहिती द्यावी असे आदेश देण्यांत येत आहेत. तसेच यापुढे जन माहिती अधिका-यांनी माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने तात्काळ माहिती पुरवियाची दक्षता घ्यावी, अशी समज देण्यात येत आहे. प्रथम अपिलीय अधिका-यांनी यापुढे पहिल्या अपिलावर विहित मुदतीत सुनावणी घेउन निर्णय घेण्याची दक्षता घ्यावी अशी सक्त ताकीद देण्यात येत आहे.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई**

**मुंबई / दिनांक :-१६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-५४/०२**

श्री. श्रीनिवासन गोपाळ कुलकर्णी, ------अपीलार्थी
डी/१०२, फाल्कन कॅस्टन को,ऑप.हौसिंग सोसायटी लि.
८३३/अे, सेनापती बापट मार्ग ,
लोअर परेर्ल ,मुंबई- ४०० ०१३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक धमार्दाय आयुक्त, ------उत्तरवादी.
रायगड डिव्हिजन, अलिबाग, रायगड.

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन,
सुधागड एज्युकेशन सोसायटी,
पाली, सुधागड- ४१० २०५.

***---विवेचन-***

अपिलार्थी श्री. श्रीनिवासन गोपाळ कुलकर्णी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये जन माहिती अधिकारी, सुधागड एज्युकेशन सोसायटी, पाली, जि.रायगड यांचेविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे नोंदणीकृत संस्था संचलित शाळा, संबंधित कमर्चारी, संस्थेच्या कौन्सिलच्या चुकीच्या निर्णयामुळे संस्थेचे नाहक लाखो रूपयांचे होत असलेल्या नुकसानीबाबत माहिती मिळण्यासाठी दि. १५.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.२.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी अपिलीय अधिकारी, श्री.लोहार. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड तसेच अपिलार्थी हजर होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतले तसेच उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता पुढील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपिलार्थीने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अन्वये संस्था संचालित शाळेतील कर्मचारी देविदास होडगे यांच्या निलंबनाबाबत, त्यांना सेवेत

पुनःस्थापित केल्याने रुपये १२,३५,०००/- रक्कम अदा केल्याबाबत तसेच संस्थेच्या कौन्सिलच्या चुकीच्या निर्णयाबाबत दिनांक २५.७.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिका-याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अर्जदारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. अपिलीय अधिकारी कोण याबाबत कळविले नाही. त्यामुळे अर्जदाराने व्यथित होउन जन माहिती अधिका-यांविरुध्द सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड यांचेकडे दि. ११.९.२००६ रोजी अपील केले.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती कायद्यानुसार देणे बंधनकारक आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती द्यावी. प्रथम अपील अधिका-याचे नांव त्यांना देण्यात यावे असे दि. ११.९.२००६ च्या अपिलाच्या संदर्भात अध्यक्ष, सुधागड एज्युकेशन सोसायटी पाली, ता.सुधागड, जि.रायगड यांना सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड यांनी दिनांक २६.९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. जन माहिती अधिका-याने अर्जदारास माहिती दिली नसल्याने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७ (१) चा भंग केला आहे. ही गंभीर बाब आहे. हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अर्जदारास माहिती दयावी असे आदेश देण्यात येत आहेत. अर्जदारास विहित वेळेत माहिती का दिली नाही, प्रथम अपिलीय अधिकारी कोण आहे हे कळविले नाही याबाबत जन माहिती अधिका-यांनी राज्य माहिती आयोगास खुलासा सादर करावा. यापुढे माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने तात्काळ माहिती पुरविण्याची दक्षता घ्यावी, अशी समज देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-१६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-२३४४/०२**

श्री. ईश्वरलाल एस.अगरवाल, ------अपीलार्थी
१/क / ५, तोलाराम नगर,
चेंबूर, मुंबई- ४०० ०७४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, ------उत्तरवादी.
मुंबई विद्यापीठ, फोर्ट मुंबई- ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक,
कालिना, सांताक्रूझ (पूर्व) , मुंबई-४०० ०९८.

***---विवेचन-***

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये श्री.ईश्वरलाल अगरवाल यांनी प्रथम अपि अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ तसेच जन माहिती अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, परिक्षा नियंत्रक, म विद्यापीठ यांनी एल.एल.बी.च्या सन २००५ च्या सेमीस्टरच्या प्रश्नपत्रिकाच्या प्रमाणित प्रती, सर्व उत्तरपत्रिकांचे सिनॉप दिले नाहीत. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दि.४.८.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपिलावरील सुनावणीकरिता अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी तथा परीक्षा नियंत्रक, अपिलीय अधि तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांना यु.पी.सी.ने पत्र पाठवूनही सुनावणीसाठी हजर झाले नाहीत.

उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलाथीर्ने एल.एल.बी.च्या सन २००५ च्या पाचव्या सेमिस्टर प्रश्नपत्रिकांच्या प्रमाणित प्रती, सर्व उत्तरपत्रिकांचे सिनॉप्टीक उपलब्ध करुन देण्याबाबत केंद्रिय माहितीचा अधि अधिनियम,२००५ च्या कलम ६(१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ यांचेकडे मा केली होती. विविध परिक्षांच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाच्या काउंटरवर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. उत्तरपत्रिकांचे सिनॉप गोपनीय स्वरुपाचे असल्याने ते आपणांस देता येत नाहीत असे विद्यापीठाने परीक्षा नियंत्रक तथा जन माहिती अधिका-य अपिलाथीर्स दि.८ मार्च ,२००६ च्या पत्रान्वये कळविले.

जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने व्यथित होवून अपिलार्थीने प्रथम अपिलीय अधिकारी तथा निबंधक, मुंबई विद्यापीठ यांच्याकडे दि.६.४.२००६ रोजी अपील दाखल केले. परंतु, प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही. विहित मुदतीत अपील निकालात काढले नाही. अपिलार्थी कडे पूर्णपणे दुर्लक्ष करून प्रथम अपिलीय अधिका-यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(६) चा भंग केला आहे.

एल.एल.बी.च्या सन २००५ च्या पाचव्या सेमिस्टरच्या प्रश्नपत्रिकांची अपिलार्थीची मागणी आहे. मुंबई विद्यापीठाच्या विविध परीक्षांच्या प्रश्नपत्रिका (Price Publication) काऊंटरवर विक्रीसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. अपिलार्थीने त्या प्राप्त करून घ्याव्यात. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. तरी त्याप्रमाणे अपिलार्थीने प्रश्नपत्रिका प्राप्त करुन घ्याव्यात. उत्तरपत्रिकांचे सिनॉप्टीक गोपनीय स्वरुपाचे असल्याने ते देण्याचे जन माहिती अधिका-याने नाकारले आहे. प्रथम अपिलीय अधिका-याने याबाबत कांही आदेश पारित केलेले नाहीत.

उत्तरपत्रिका तपासणीसास उत्तरपत्रिका तपासणे सोईचे व्हावे म्हणून उत्तरपत्रिकांचे सिनॉप्टीक तयार करण्यात येतात. काम झाल्यानंतर त्याचे जतन केले जात नसल्याचे माहिती अधिका-यांनी सुनावणीचे वेळी सांगितले. अशाप्रकारे अपीलकाराने याप्रकरणी उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

***---आदेश---***

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-१६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-३८/०२**

श्री. मोहमद अफजल, ------अपीलार्थी
सी-५०८, आकार ए.एस.एन.को.ऑप.हौ.सो.लि.
कल्याण कॉम्प्लेक्स, यारी रोड, वर्सोवा,
अंधेरी (प) मुंबई- ४०० ०६१.

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा जन माहिती अधिकारी , ------उत्तरवादी.
वैध मापन शाखा विभाग,
६०१, अरुण चेंबसर्, ६ वा मजला,
ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.

***---विवेचन-***

श्री. मोहमद अफजल, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेली माहती अपूर्ण असल्याने राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.१०.२००६ रोजी अपील दाखल केले. दाखल केलेल्या अपिलावर दि.२९.४.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीस प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी, वैध मापन शाखा विभाग, मुंबई यांना तसेच अपिलार्थी यांना यु.पी.सी.ने दिनांक ११.४.२००८ रोजी पत्र पाठवूनही कोणीही हजर नव्हते.

कागदपत्रांवरून असे दिसते की, जन माहिती अधिका-याकडे अर्जदाराने केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम ६(१) अन्वये दि.१०.७.२००६ रोजी अर्ज सादर करून उपहार- गृहे, चित्रपटगृह, मल्टीप्लेक्समध्ये कोल्ड्रींक, आईस्क्रीम आणि इतर खाद्यपदार्थ किरकोळ किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री केले जातात याबाबत तसेच इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन

माहिती अधिकारी, उप नियंत्रक, वैध मापन शाखा, मुंबई विभाग यांनी अपूर्ण व त्रोटक माहिती दिल्याने व्यथित होवून अर्जदाराने दि.२९.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलीय अधिका-यांनीही परिपूर्ण माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने, जन माहिती अधिका-याकडे मागितलेली माहिती पूर्णपणे दिली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यानेही अपिलकारास पूर्ण माहिती दिली नसल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते. चित्रपटगृहे, उपहारगृहे, मल्टीप्लेक्समध्ये कोल्ड्रींक, आईस्क्रीम आणि इतर खाद्यपदार्थांची किरकोळ किंमतीपेक्षा अधिक दराने विक्री केली जाते. यामुळे पॅकेज कॉमोडीटीज ॲक्ट १९७७ च्या तरतुदीचा भंग होतो. कायद्याचा भंग करणा-या विरुध्द दंडात्मक कार्यवाही करावी. स्वाधिकारे धाडी टाकल्या आहेत काय, दोषी लोकांविरुध्द कायद्यातील तरतुदीप्रमाणे किती लोकांना दंड आकारला, याबाबतची सविस्तर माहिती अपिलार्थीस देणे आवश्यक आहे. जनतेच्या दृष्टीने हा जिव्हाळयाचा विषय आहे. पॅकेज कॉमोडीटीज ॲक्ट १९७७ ची अंमलबजावणी उप नियंत्रक, सहायक नियंत्रक, वैध मापन शाखा, मुंबई महानगर यांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे. कायद्याचा भंग करणा-या विरुध्द कडक कार्यवाही होणे आवश्यक आहे. सदर बाब लक्षात घेवून अपिलकारास दिनांक १०.७.२००६ च्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती ३० दिवसांचे आत दयावी, असे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांना आदेश देण्यांत येत आहेत.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-१६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-४०/०२**

श्री. अरुण वसंत दंडगवाळ ------अपीलार्थी
सहायक आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग,
अब्दुल गफार खान मार्ग ,
वरळी सी फेस, वरळी, मुंबई

**विरुध्द**

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन)
दुग्धव्यवसाय विकास विभाग,
वरळी, मुंबई- ४०० ०१८.

२. जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य दुग्धशाळा विज्ञान संस्था,
आरे वसाहत , मुंबई-४०० ०६५. ------उत्तरवादी.

***---विवेचन-***

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये अपिलार्थी श्री.अरुण वसंत दंडगवाळ यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन) दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी प्रथम अपील पारित केलेल्या आदेशाने व्यथित होवून राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि. २९.४.२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीसाठी यु.पी.सी.ने अपिलकार, प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी यांना पत्र पाठवूनही कोणीही हजर राहिले नाहीत.

उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसते की, अपिलार्थीने जन माहिती अधिका-यांकडे दुग्ध शाळा विज्ञान संस्था येथील अधिकारी व कर्मचा-यांच्या रजेबाबत, विद्यार्थ्यांच्या तक्रारीबाबत, भत्त्याच्या प्रदानाबाबत माहिती मागितली होती. माहिती अधिकारी तथा प्राचार्य, दुग्ध शाळा विज्ञान संस्था, आरे यांनी दि.४.४.२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिली. अपिलार्थीने जन माहिती अधिका-याकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ६(१) अन्वये दि. २२.३.२००६, २७.३.२००६, २९.३.२००६ व १७.४.२००६ च्या अर्जान्वये माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याले माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता रु.२००/- इतकी रक्कम अपिलार्थीकडून

घेवूनही त्यांना आवश्यक त्या माहितीच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करून दिल्या नाहीत. दिनांक ४.४.२००६ च्या पत्रान्वये अपुरी माहिती दिली. यामुळे व्यथित होवून अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अधिनियमाच्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांनी प्रथम अपिलाची सुनावणी दि.१९.६.२००६ रोजी आयोजित केली होती. सदर सुनावणीकरिता अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी हजर होते. प्रथम अपिलीय अधिका-याने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेवून अपिलकारास त्यांनी मागितलेल्या सर्व मुद्दयावरील माहिती देण्याबाबत दि. २.८.२००६ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-याच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-याने माहिती दिली . परंतु अपिलकाराने मागितलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती कार्यालयात झेरॉक्स मशीन नसल्याच्या कारणावरून कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती दिलेल्या नाहीत. अपिलकाराने मागितलेली माहिती का देता आली नाही याबाबत कारणे नमूद करुन जन माहिती अधिका-यांना प्रत्यक्ष भेटण्याबाबत कळविल्याचे दिसते. तसेच काही माहिती दुग्ध शाळा विज्ञान संस्थेतील कर्मचा-याकडून घेण्याबाबत कळविले .

दुग्ध शाळा विज्ञान संस्थेतील अधिकारी / कर्मचा-यांच्या रजेचा तपशील अपिलकाराने मागितला होता. सेवा विषयक अभिलेख्याशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिका-याने माहिती देण्यास नकार दिला. अपिलकाराने माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिका-याकडे रु२००/-इतक्या रकमेचा भरणा केला आहे. तरी जन माहिती अधिका-याने अद्याप आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपिलकारास दिल्या नाहीत. ही बाब लक्षात घेता जन माहिती अधिका-यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकाराने मागितलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती १५ दिवसांच्या आत उपलब्ध करून द्याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा. यापुढे माहितीच्या अर्जास परिपूर्ण माहिती विहित वेळेत देण्याची दक्षता घ्यावी.

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई**

**मुंबई /दिनांक :-१६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-६६/०२**

**श्री.रवी नामदेव जोशी,** **------अपीलार्थी**
**नारळी आग्रीपाडा, १९ वा रस्ता,**
**रामको चाळ, रुम नं.४,**
**खार (प) मुंबई- ४०० ०५२.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ,**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ पश्चिम वॉर्ड कार्यालय,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारत व कारखाने)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**के/ पश्चिम वॉर्ड कार्यालय,**
**अंधेरी (प.) मुंबई- ४०० ०५८** ------उत्तरवादी.

***---विवेचन-***

अपिलार्थी श्री. रवि जोशी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ६(१) अन्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, अंधेरी यांचेकडे घर नं.जी- ४२, जुहू चचरोंड, विलेपार्ले येथील बांधकामाबाबत व इतर अनुषंगिक माहिती दि.२०.७.२००६ च्या अर्जान्वये मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कालावधीत उत्तर दिले नाही. यामुळे अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झाला आहे. मागितलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दि.१८.९.२००६ रोजी अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.९.२००६ रोजी अपिलकाराने दाखल केलेल्या अपिलावर दि.१०.१०.२००६ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीसाठी श्री.रवि जोशी. श्री.बी.एम.

साळवे, सहायक अभियंता तथा जन माहिती अधिकारी हजर होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देयास १ महिना २० दिवस उशीर केला आहे. यासाठी जन माहिती अधिका-यास दंडित करण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-यांना अधिकार नाहीत. जन माहिती अधिका-याने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी म्हणजे दि.१०.१०.२००६ रोजी अपिलार्थीस हवी असलेली माहिती दिली. जन माहिती अधिका-याले अपिलकारास आवश्यक ती कागदपत्रे, फाईल्स ७ दिवसांचे आत दाखवाव्यात असे दि. १३.१०.२००६ रोजी आदेश पारित केलेत.

प्रथम सुनावणीच्या वेळेस जी माहिती दिली ती समाधानकारक व खरी दिलेली नाही. बरीचशी माहिती दडवून ठेवली. त्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि.६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, श्री.आर.एस.ढोले, सहायक अभियंता, प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री. धामणे, सहायक महानगरपालिका आयुक्त हे हजर होते.

द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इमारती व कारखाने) के/पश्चिम वॉर्ड यांनी अपिलकारास मुद्देनिहाय आवश्यक कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रतींसह माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांनी यापुढे माहितीच्या अर्जास अधिनियमातील तरतुदीनुसार ३० दिवसांचे आत उत्तर देण्याची दक्षता घ्यावी अशी समज देण्यांत येत आहे.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, मुंबई**

**मुंबई /दिनांक :-१६.०५.२००८**

**मुख्य माहती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-२०३६/०२**

**श्री. महाबीर उर्स,** **------अपीलार्थी**
**५०२ सरिता स्वप्न नगरी,**
**मुलुंड (प.), मुंबई- ४०० ०८०.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,** **------उत्तरवादी.**
**मुंबई उपनगरीय जिल्हा, ९ वा मजला,**
**नवीन प्रशासकीय इमारत,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई -४०० ०५१.**

**२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुर्ला (मुलुंड ),**
**टोपीवाला कॉलेज इमारत, १ ला मजला,**
**मुलुंड (प.) मुबई ३ ४०० ०८०.**

***---विवेचन---***

श्री. महाबीर उर्स यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अन्वये दिनांक २२.५.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुर्ला (मुलुंड ) यांच्याकडे मुलुंड व नाहूर येथील जमिनीबाबत खालील मुद्दयांवर माहिती मागितली.

(१) मौजे मुलुंड व नाहूर येथील सर्व खाजगी वन जमिनीचा सर्वे नंबर.

(२) वरील जमिनीच्या बिन शेतीकडे वर्ग झाल्याबाबत तारीख.

(३) वरील जमिनीचे ७/१२ ला वन खात्याचे नाव दाखल झाले आहे का,

वरील माहितीाबाबत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुर्ला (मुलुंड ) यांनी दिनांक १७.७.२००६ च्या पत्रान्वये अर्जदार श्री, महाबीर उर्स यांना माहिती दिली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्याने दि. ११.८.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांच्याकडे प्रथम अपील सादर केले. प्रथम अपिलीय अधिका-याने या प्रकरणी दि. ११.९.२००६ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी अपिलकाराने स्वतः हजर राहून लेखी म्हणणे सादर केले. तसेच जन माहिती

अधिका-यांतर्फे श्री.एस.व्ही.किरवे, तलाठी, मुलुंड व श्री. सुर्यकांत जाधव, तलाठी, नाहूर हे हजर होते. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी दरम्यान अपिलकार तसेच जन माहिती अधिका-यांचा युक्तीवाद ऐकून पुढीलप्रमाणे निर्णय दिला. " तहसिलदार कुर्ला यांनी अपिलकाराने मागणी केलेली माहिती म्हणजे मौ.मुलुंड येथील सर्वे नं. २३६, २३८, २३९, २४४, २४५, २४९, २५१, २५५, ३५५ आणि मौ. नाहूर येथील सर्वे नं. १५५ या मिळकती बिनशेती प्रयोजनार्थ केव्हा वर्ग झाल्या व कोणत्या आदेशान्वये याबाबतची माहिती अपिलकारास देण्याबाबत प्रथम अपिलीय अधिका-याने जन माहिती अधिका-यास आदेश दिले. "

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुर्ला यांनी दि. ६.१.२००७ रोजी अपिलकारास माहिती उपलब्ध करून दिली. तसेच मुलुंड येथील सर्वे नं. २३६, २३८, २४९, ३५५ व मौ. नाहूर येथील सर्वे नं.१५५ येथील जमिनीस खाजगी वन जमीन संपादन कायदा तरतूद लागूअसला तरी सदर जमिनीस बिनशेती परवानगी देण्यात आली नसल्यामुळे याबाबतची माहिती अर्जदारास देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिका-याने मौ. मुलुंड सर्वे नं.२३९, २४४,२४५, २५१ व २५५ बाबतची माहिती अर्जदारास दि. १०.१.२००७ रोजी दिली. जन माहिती अधिका-याने दि. १७.७.२००६ व ६.१.२००७ रोजी अर्जदारास माहिती उपलब्ध करून दिली, व ती अर्जदाराने स्वीकारली. यावरून दि.२२.५.२००६ च्या अर्जान्वये अर्जदाराने मागितलेल्या सर्व मुद्दयांची माहिती जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करून दिली असल्याचे दिसून येते.

अपिलकार श्री.महाबीर उर्स, यांनी जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या माहितीने व्यथित होवून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.९.१०.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलास अनसरून दि.२६.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगामार्फत जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, कुर्ला (मुलुंड) यांना नोटीस पाठविण्यांत आली होती. सदर नोटीशीस अनुसरून जन माहिती अधिका-यांनी पुन्हा अपिलकारास दि.३.३.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिका-याविरूध्द केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या द्वितीय अपिलाची सुनावणी दि.

२३.०५.२००८ रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी तथा पी.एस.देवरे यांचे प्रतिनिधी तसेच जन माहिती अधिकारी श्रीमती एच.एच.भाबड, प्रभारी तहसिलदार, कुर्ला हे हजर होते. अपिलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेवून उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता, अपिलकारास मागणीनुसार आवश्यक ती माहिती उपलब्ध करून दिली असल्याचे दिसून येते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ खाली अपेक्षित असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे. त्यामुळे जन माहिती अधिका-याने व प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशाबाबत हस्तक्षेप करण्याची आयोगाला आवश्यकता वाटत नाही.

त्यामुळे या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**--- आ दे श --**

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-२६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-७०/०२**

**श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय, ------**
**अपीलार्थी**
**२/१३, आदिनाथ सीएचएस**
**इली कटुरी शाळेसमोर,**
**माझागांव, मुंबई- ४०० ०१०.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (प्रतिबंध), ------उत्तरवादी.**
**पोलीस आयुक्त कार्यालय,**
**मुंबई -४०० ००१.**

**२. जनमाहिती अधिकारी तथा**
**सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे),**
**पोलीस आयुक्त कार्यालय,**
**मुंबई -४०० ००१.**

**---- वि वे च न -**

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अन्वये दि. १.१२.२००६ च्या अर्जान्वये आर्थिक गुन्हे विभागास दिलेल्या तक्रार अर्जा संदर्भातील छायांकित सत्य प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी तथा श्री. के.पी.गावीत. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्याकडे केली. यासंदर्भात जन माहिती अधिका-यांनी दि. २७.१२.२००६ च्या पत्रान्वये अर्जदारास माहिती दिली. सदर माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले. सदर अपिलावर प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या आदेशाने अपिलकाराचे समाधान न झाल्याने अपिलकाराने अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दिनांक २१.५.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली. सुनावणीस जन माहिती अधिकारी हजर होते. अपिलार्थी हजर नव्हते.

सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेवून, तसेच उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता, पुढील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.कमलाकर शेणॉय यांनी दिनांक २९.१०.२००५ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज सादर करून १५ लाख डॉलर्स बाबत आर्थिक गुन्हे विभागास दिलेल्या तक्रार अर्जा संदर्भातील माहितीची मागणी केली होती. सदर तक्रारी संदर्भात पोलीस उप निरीक्षक श्रीमती वीणा सावकार यांनी प्राथमिक चौकशी करून सदर प्रकरणामध्ये कोणताही दखलपात्र गुन्हा घडला नसल्याचे दिसून येत असल्याबाबत अर्जदारास तोंडी माहिती दिल्याबाबतचा अहवाल दिला. अर्जदाराने यासंदर्भात कागदपत्रांच्या निरीक्षणाची केलेली मागणी माहिती अधिका-याने फेटाळल्यानंतर अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. २.१.२००७ रोजी अपील दाखल केले. या प्रकरणातील त्रयस्थ पक्ष डॉ. अशोक के.गांधी यांनी माहिती उपलब्ध करून देण्यात येवू नये असे दि. १३.१.२००६ रोजी लेखी निवेदन सादर केले. यामुळे अपिलकाराच्या कागदपत्रांची निरीक्षणाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम ८ (१) (ज) आणि कलम ११ अन्वये नाकारली.

सदर आदेशाविरूध्द अपिलकाराने व्यथित होवून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. याबाबत मा.मुख्य माहिती आयुक्तांनी अपिलकार यांनी दाखल केलेल्या तक्रारीबाबत पोलीस अधिकारी यांनी केलेल्या तपासाबाबतची कागदपत्रे पहाण्यास परवानगी देण्याबाबत आदेशित केले. तद्नुषंगाने दि. १३ जुलै, २००६ रोजी आर्थिक गुन्हे विभागाकडून नमूद कागदपत्रे अपिलकारास दाखविण्यांत आली.

मा. मुख्य माहिती आयुक्तांनी दिलेल्या आदेशा विरूध्द डॉ. अशोक गांधी यांनी दि. १८.७.२००६ रोजी मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्रमांक २६४४/ २००६ दाखल केले. सदर रिट पिटीशनवर मा. उच्च न्यायालयाने अदयाप कोणतेही आदेश पारित केलेले नाहीत.

राज्य माहिती आयोगाने दिलेल्या निर्णयाबाबत डॉ. अशोक गांधी यांनी मा. उच्च न्यायालयात दिलेल्या आव्हानाबाबत अदयाप कोणताही निर्णय न्यायालयाने दिलेला नाही. त्यामुळे डॉ. अशोक गांधी यांच्या रिट पिटीशनद्वारे कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस उपलब्ध करून देणे संयुक्तिक होणार नाही. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मा. उच्च न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास कागदपत्रे उपलब्ध करून देण्यास नकार

दिलेला आहे. या निर्णयाशी प्रथम अपिलीय अधिकारी सहमत असल्याबाबत दिनांक १८.१.२००६ रोजी आदेश पारित केले आहेत.

अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दिलेले उत्तर, प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेला निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधाील तरतुदी नुसार असल्यामुळे यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.

या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>--- आ दे श --</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-२६.०५.२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-७३/०२**

**श्री. सुधाकर शंकरराव सुरडकर,** **------**
**अपीलार्थी**
**८०१, बुलेट राज्यपत्रित पोलीस अधिका-यांची गृहनिर्माण संस्था,**
**एल.एन.रोड, हिंदू कॉलनी,**
**दादर (पूर्व), मुंबई- ४०० ०१४.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक (आस्थापना), ------उत्तरवादी.**
**पोलीस महासंचालक कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ०३९.**

**२. जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ उप सहायक (आस्थापना),**
**पोलीस महासंचालक कार्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ०३९.**

**---- वि वे च न -**

श्री. सुधाकर शंकरराव सुरडकर, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम (६) अन्वये दि. ६.११.२००६ च्या अजार्न्वये सर्वश्री उल्हास जोशी, सी.प्रभाकर व आर.ई.पवार या पोलीस अधिका-यांविरू ध्द खटला पाठविणे/ खात्यामार्फत कारवाई करणेबाबत जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ उप सहायक (आस्थापना) यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-याने दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान झाले नसल्याने व्यथित होवून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दि. २५.१.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलावर दि. १६.५.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीस अपिलकार व जन माहिती अधिकारी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपिलकाराने दि. ६.११.२००६ अन्वये जन माहिती अधिका-याकडे सवश्री उल्हास जोशी, सी.प्रभाकर व आर.ई. पवार या पोलीस अधिका-यांबाबत जन माहिती अधिका-यांकडे खालील माहिती मागितली होती.

(१) वरील अधिका-यांविरूध्द खात्यामार्फत चौकशी करण्याचा (गुन्हा नं.८२/९३, काशिमिरा पोलीस स्टेशन) निर्णय कधी घेण्यात आला व तो कोणी घेतला.

(२) सदर अधिका-याविरूध्द खटला पाठविण्यास कलम १९७ सी.आर पी.सी.प्रमाणे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवावा असा निर्णय कधी घेण्यात आला, तो निर्णय कोणी घेतला.

(३) खटला न पाठविण्याचा निर्णय कोणी व कधी घेतला.

(४) खात्यामार्फत चौकशीसाठी दोषारोपाचा मसुदा कोणी व कधी तयार केला.

(५) शासनाला खात्यामार्फत चौकशीचा प्रस्ताव कधी पाठविण्यांत आला.

(६) वरील निर्णय प्रक्रियेत घेण्यात आलेल्या फाईलच्या टिप्पणीची प्रत किंवा अवलोकन करून आवश्यक माहिती घेण्यास परवानगी

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ नुसार सदरची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने अर्जदारास माहिती उपलब्ध करून दयावी किंवा कसे याबाबत जन माहिती अधिका-यांकडून त्रयस्थ पक्षास नोटीस देण्यात आली. अर्जदारास माहिती देण्यास त्रयस्थ पक्षाने आक्षेप घेतला. त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (१) (जे) नुसार सदरची माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-याने अर्जदारास दि. २७.११.२००६ च्या पत्रान्वये कळविले.

जन माहिती अधिका-यांच्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. २९.११.२००६ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री.संजय बर्वे, पोलीस उप महानिरीक्षक (आस्थापना) यांनी अपिलावर सुनावणी घेवून आदेश पारित न करता अपिलकाराने मागविलेल्या माहितीबाबत दि,१९.१२.२००६ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय सविस्तर माहिती दिली.

त्रयस्थ पक्षाने सेवांतर्गत बाबीचे प्रकरण असल्याने अर्जदारास माहिती देण्याबाबत आक्षेप घेतला. म्हणून अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यास जन माहिती अधिका-यांनी नकार दिला. मुद्दा

क्र.२ व ५ बाबत अपिलकारास माहिती दिली, सवर्श्री उल्हास जोशी, सी.प्रभाकर व श्री,आर.ई.पवार या पोलीस अधिका-यांविरूध्द भ्रष्टाचाराच्या ब-याच तक्रारी होत्या. त्यांची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी सुरू होती. श्रीकृष्णन तत्कालिन पोलीस महासंचालक यांनी खटला पाठविण्याबाबत CID ला सूचना दिल्या. पण तसे न करता सदर अधिका-यांची खात्यामार्फत चौकशी करण्याचे ठरले. चौदा वर्षानंतर देखिल कारवाई झाली नाही असे अपिलकाराने सुनावणीच्या वेळी लेखी निवेदन सादर केले.

अपिलातील कागदपत्र व अपिलकार यांच्या निवेदनाचा साकल्याने विचार करता असे स्पष्ट दिसून येते की, संबंधित पोलीस अधिका-यांविरुध्द खातेनिहाय विभागीय चौकशी पूर्ण झाल्याशिवाय अपिलकारास माहिती देणे उचित वाटत नाही. तथापि, या प्रकरणी मी असे आदेश देतो की, सदर अधिका-यांविरूध्दची खातेनिहाय विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपिलाकरास मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करून दयावी.

सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**--- आ दे श --**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
दिनांक :-२६.०५.२००८.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-११६/०२**

**श्री. अरुण कृष्णा गवेकर,** **------अपीलार्थी**
**२५ अे / २०२, सुयोग,**
**बिंबिसार नगर, पश्चिम द्रूतगती मार्ग,**
**गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६५.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, कोल्हापूर,**
**अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय,**
**कोल्हापूर, महाराष्ट्र.**

**२. जनमाहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालय,**
**गडहिंग्लज विभाग, ता, गडहिंग्लज,**
**जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र.** **------उत्तरवादी.**

**<u>---- वि वे च न -</u>**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अनुसार श्री. अरुण कृष्णा गवेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी गडहिंग्लज, विभाग गडहिंग्लज यांचेकडे अर्ज सादर करून श्री. वसुंधरा मारूती पाटील, दुंगडे, ता.चंदगड यांना मंजूर करण्यांत आलेल्या केरोसीन परवान्याबाबत एकूण १६ मुद्दयाबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने अर्जदारास दि. १४.८.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे अर्जदाराचे समाधान झ ाले नाही. त्यामुळे अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. २३.८.२००६ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने पारित केलेल्या आदेशाने व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि. २६.०५.२००८ रोजी आयोजित करण्यांत आली. सुनावणीसाठी अपिलकार श्री.अरूण गवेकर, जन माहिती अधिकारी तथा डॉ.किरण महाजन, उप विभागीय अधिकारी, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर व प्रथम अपिलीय अधिकारी श्री.डी.डी.वळवी, अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर हे हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री.अरूण गवेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम (६) अन्वये नियम ३ मधील जोडपत्र अ प्रमाणे जन माहिती अधिका-यांकडे अर्ज सादर करून श्रीमती

वसुंधरा मारूती पाटील, रा.दुंडगे. ता.चंदगड यांना मंजूर करण्यांत आलेल्या केरोसीन परवान्याबाबत एकूण १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. नेमक्या कोणत्या कागदपत्रांची माहिती आवश्यक आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. आवश्यक असलेल्या कागदपत्रांचा स्पष्ट उल्लेख करून आवश्यकतेनुसार फेर अर्ज सादर करावा असे दि.१४.८.२००६ च्या पत्रान्वये अपिलकारास कळवून त्यांचा अर्ज जन माहिती अधिका-यांनी निकाली काढला.

जन माहिती अधिका-यांच्या उत्तराने समाधान झाले नसल्यामुळे अपिलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. २३.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांकडील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी, अपिलकाराचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. तसेच कागदोपत्री पुरावे तपासले असता, श्रीमती वसुंधरा मारूती पाटील, यांना मंजूर केलेल्या केरोसीन परवान्याबाबत प्रश्नार्थक स्वरूपाची माहिती मागितली आहे. विशेष तारखेची किंवा झालेल्या निर्णयाची अशा स्वरूपाची माहिती मागितली नाही. म्हणून जन माहिती अधिका-याकडे अपिलकाराने फेर अर्ज करून माहिती प्राप्त करून घ्यावी. अपिलकाराचा फेर अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना आवश्यक ती माहिती देण्यांत यावी असे प्रथम अपिलीय अधिका-याने दि. १६.१०.२००६ रोजी आदेश पारित करून प्रथम अपील निकालात काढले.

प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाने अपिलकाराचे समाधान झाले नाही. त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळाली नाही म्हणून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००६ रोजी अपील दाखल केले. आवश्यक असलेली माहिती अपिलकारास देण्यात आली. अपिलकारास प्रकरणाच्या कागदपत्रांची पहाणी करण्यास परवानगी देण्याची तयारी जन माहिती अधिका-यांनी दर्शविली. त्यानुसार अपिलकारास हवी असलेली अधिक माहिती देण्यांत येईल असेही जन माहिती अधिका-याने सुनावणीच्या वेळी प्रतिपादन केले.

सबब, मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**--- आ दे श --**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-२६.०५.२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-१३३/०२**

**श्री. वामन विष्णू चव्हाण,** **------अपीलार्थी**
**७६/ई, लोकोत्कर्ष वाचनालय, भवानी पेठ,**
**मंगल सोसायटी जवळ, र. अ. किडवाई मार्ग,**
**माटुंगा, मुंबई- ४०० ०१९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी,,**
**जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, जुने जकात घर,**
**शहीद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई -४०० ००१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार मुंबई शहर,**
**जुने जकात घर, शहीद भगतसिंग रोड,**
**फोर्ट, मुंबई -४०० ००१.** **------उत्तरवादी.**

**<u>---- वि वे च न -</u>**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेल्या द्वितीय अपिलावर दिनांक २७.५.२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. वामन विष्णू चव्हाण, माटुंगा, मुंबई हे हजर होते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी सुनावणीच्या वेळी अनुपस्थित होते.

अपिलार्थी श्री.वामन विष्णू चव्हाण यांनी त्यांच्या दिनांक १३.२.२००६ च्या अर्जान्वये आर.ए. किडवाई मार्ग व बी.पी.टी. रेल्वे लाईन येथील झोपडपट्टी विभागात पूरग्रस्त बाधित कुटुंबांना अदा केलेल्या रकमेची तपशिलवार माहिती जन माहिती अधिका-यांकडून मागितली होती. जन माहिती अधिंका-याने त्यांच्या दिनांक ३०.११.२००६ व दिनांक ४.३.२००६ च्या पत्रान्वये श्री.चव्हाण यांना माहिती उपलब्ध करण्यासाठी शुल्क भरण्याचे कळविले होते.

सुनावणी दरम्यान अपिलकार श्री.चव्हाण यांना अपुरी माहिती मिळाल्याचे प्रतिपादन केले. उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता व अपिलकाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपिलकाराला अपुरी माहिती मिळाल्याचे दिसून आले. सबब, जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीने मागितलेली माहिती विनाशुल्क हे आदेश प्राप्त झाल्यापासून वीस दिवसांत उपलब्ध करून दयावी असे आदेश देण्यांत येत आहेत.

उपरोक्त बाबी विचारात घेवून मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**--- आ दे श --**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक :-२७.०५.२००८.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-१२२/०२**

**श्री. मोतीराम महादेव सोनकुसळे, ------अपीलार्थी**
**ए- १९/६, ए. ए. आई. कॉलनी,**
**अंधेरी सहार रोड,**
**अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उप विभागीय अधिकारी, नागपूर.**

**२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**तहसिलदार कार्यालय, हिगणा, जिल्हा नागपूर. ------उत्तरवादी.**

**---- वि वे च न ---**

**श्री. मोतीराम महादेव सोनकुसळे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अनुसार नियम ३ मधील जोडपत्र- अ मधील विहित नमुन्यात जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा, जि.नागपूर यांचेकडे दि.१७.७.२००६ रोजी अर्ज सादर करुन अर्जदारास त्यांचे "हलबा" जातीचे पत्र निर्गमित केले आहे किंवा कसे, जातीचे प्रमाणपत्र प्रकरणाची सत्यप्रत तसेच रजिस्टर मध्ये प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेल्या अभिलेख्याची साक्षांकित प्रत देण्याबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने अर्जदारास माहिती दिली नसल्याने व्यथित होवून अर्जदार श्री.मोतीराम सोनकुसळे यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(१) खाली प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे दि. १५.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपिलकाराने मागणी केलेली माहिती पुरवून तथा अहवाल सादर करण्याबाबत अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी तथर तहसिलदार, हिंगणा, जि.नागपूर यांना दिनांक २०.९.२००६ व ३१.१०.२००६ रोजी पत्रान्वये कळविले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी दीर्घ कालावधी उलटूनही अपिलकारास मागणीप्रमाणे माहिती दिली**

नाही.  त्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.७.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.  सदर अपिलाची सुनावणी दि. २७ मे. २००८ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात आली.  सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, अपिलकार हजर नव्हते.  प्रथम अपिलीय अधिकारी हजर होते.

सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिका-यांचे म्हणणे ऐकून घेवून व कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

श्री.मोतीराम महादेव सोनकुसळे यांनी अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा यांचेकडे दि.१७.७.२००६ रोजी अर्ज सादर करुन रेव्हयुनी केस नं.८०, एम.आर.सी.८१/८८-८९, दि. ९.८.१९८८ अनुसार श्री. एम. एच. टोणगांवकर, तहसिलदार, हिंगणा यांचे कडून अर्जदारास अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देयात आले असल्याची बाब तहसिलदार यांच्या निदर्शनास आणून त्यांचे जाती प्रकरणाची सत्यप्रत तसेच रजिस्टरमध्ये प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेल्या अभिलेख्याची साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-याने विहित वेळेत मागणी केलेली माहिती दिली नाही.  त्यामुळे व्यथित होवून अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, नागपूर यांचेकडे दि.१५.९.०६ रोजी प्रथम अपील दाखल केले.  त्यामध्ये तहसिलदार, हिंगणा, जि.नागपूर या कार्यालयातून अर्जदाराचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र निर्गमित झालेले आहे हे सिध्द करण्यासाठी व या विषयीचा अहवाल अर्जदार नोकरी करीत असलेल्या एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया, सी.एस.आय. एअरपोर्ट, मुंबई यांना सादर करण्यासाठी जाती प्रमाणपत्र प्रकरणाच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतींची मागणी केली.

प्रथम अपिलीय अधिका-याने अपिलावर सुनावणी आयोजित केली नाही.  अपिलकाराने मागितलेली माहिती परस्पर देण्याबाबत जन माहिती अधिका-यास दि.२०.९.२००६ व ३१.१०.२००६ रोजी पत्र पाठवून सूचना दिल्या.  याप्रकरणी अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार प्रथम अपिलीय

अधिका-याने सुनावणी आयोजित करुन आदेश पारित करणे आवश्यक होते.  प्रथम अपिलीय

अधिका-याने तशी कार्यवाही केली नाही. अपिलकाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिका-यास पत्रान्वये सूचना दिल्या. परंतु अपिलकारास दीर्घकाळ उलटून गेला तरी माहिती मिळाली नाही. त्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले.

तहसिल हिंगणा कार्यालयातून निर्गमित करण्यात आलेल्या जाती प्रमाणपत्र प्रकरणाची कागदपत्र तहसिल कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे. याप्रकरणी अपिलकाराने मागितलेली माहिती अपिलकारास विहित वेळेत उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिका-याच्या सदर कृतीमुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७(१) चा भंग झाला आहे, ही एक गंभीर बाब आहे.

मी या प्रकरणी आदेश देतो की, सदर प्रकरणी अपिलकाराने मागितलेली माहिती देण्यासाठी तहसिल कार्यालयातील अभिलेख्याचा पुन्हा कसून शोध घेवून मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-याने माहिती उपलब्ध करुन दयावी. प्रथम अपिलीय अधिका-याने यापुढे अपिलावर सुनावणी घेवून विहित वेळेत आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी. जन माहिती अधिका-याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीचा भंग केला आहे. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सदर प्रकरणी वेळोवेळी पत्र पाठवूनही विहित वेळेत अहवाल सादर केला नाही. अपिलकारास माहिती दिली नाही. या परिस्थितीत जिल्हाधिकारी, नागपूर यांनी आवश्यकतेनुसार जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, हिंगणा यांचे विरूध्द विभागीय चौकशी सुरू करावी. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा. सबब, आता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

--- आ दे श --

अपील मान्य करण्यांत येत आहे.

( रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक :-२७.०५.२००८.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-१३३/०२**

**श्री. वामन विष्णू चव्हाण** ------अपीलार्थी
**७६/ ई , लोकोत्कर्ष वाचनालय, भवानी गेट,**
**मंगल सोसायटी जवळ, र.अ. किडवाई मार्ग,**
**माटुंगा, मुंबई -१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हा दंडाधिकारी कार्यालय,**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई १**

**२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार मुंबई शहर**
**जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई १** ------उत्तरवादी.

***---विवेचन---***

**श्री. विष्णू वामन चव्हाण यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अनुसार जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, मुंबई शहर यांच्याकडे दि. १३/२/२००६ रोजी अर्ज सादर करुन बी.पी.टी रेल्वे मार्गावरील झ ोपडपट्टी आणि आर.ए.किडवई मार्गावरील झोपडपट्टी येथे अतिवृष्टीमुळे बाधीत झ ालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदतीच्या वाटपाबाबत माहिती मागितली होती. जनमाहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही म्हणून अर्जदाराने दि. ६/६/२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले. जनमाहिती अधिकारी /अपिलीय अधिका-यांनी अपुरी माहिती दिल्याने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दि.१०/१/२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची सुनावणी दि. २७/५/२००८ रोजी आयोगाच्या कार्यालयात आयोजित**

करण्यात आली होती. सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी हजर नव्हते. अपीलकार श्री.वामन चव्हाण हे उपस्थित होते.

सुनावणीचे वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये अपीलकाराने बी.पी.टी.रेल्वे मार्गावरील झोपडपट्टी आणि आर.ए.किडवई मार्गावरील झोपडपट्टी अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या कुटुंबियांना तसेच व्यापारी गाळेधारकांना आर्थिक मदतीचे वाटप केल्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील नियम ३ मधील विहित नमुन्यात दि. १३/२/०६ रोजी जनमाहिती अधिका-यांकडे अर्ज सादर केला.

जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, महसूल शाखा यांनी मागणी केलेल्या माहितीबाबत शुल्क भरण्याबाबत अपीलकारास दि. ४/३/०६ च्या पत्रान्वये कळविले.

जनमाहिती अधिका-याने जाणीवपूर्वक माहिती देण्यास उशीर केला, अपूर्ण माहिती दिली, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वारंवार कार्यालयात फे-या मारण्यास लावून अपीलकाराचा छळ केल्याने व्यथित होवून संपूर्ण माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दि. ६/६/०६ रोजी प्रथम अपिलीय अधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, महसूल यांनी अपीलकारास मागणी केलेल्या माहितीबाबत रु१६४६/- शुल्क भरणा करणेस दि. ३०/११/०६ च्या पत्रान्वये कळविले. जनमाहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपूरी माहिती दिली. कार्यालयात वारंवार फे-या माराव्या लागल्या म्हणून व्यथित होवून अपीलकाराने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे

द्वितीय अपील केले.   सुनावणीचे वेळी अपीलकाराने केलेला युक्तीवाद ऐकून व अपीलातील कागदपत्रांची तपासणी करुन मी असे आदेश देत आहे की, अपीलकाराच्या मागणीप्रमाणे सदर आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून २० दिवसाचे आत अपीलकारास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन द्यावी.   केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगाकडे सादर करावा.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

---आदेश---

अपील मान्य करण्यात येत आहे.

(रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक २७/५/०८

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/९८/०२**

**श्री. कमलाकर सुकदेव दरवडे** ------अपीलार्थी

**सरचिटणीस महाराष्ट्र ओ.बी.सी. संघ,**
**दरवडे चाळ, व्ही.एन.पुरव मार्ग,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**विक्रीकर सहआयुक्त अंमलबजावणी-ड**
**८ वा माळा , विक्रीकर भवन, माझगांवमुंबई - १०**

**जनमाहिती अधिकारी**
**विक्रीकर सहआयुक्त अंमलबजावणी-ड**
**८ वा माळा , विक्रीकर भवन, माझगांव- मुंबई - १०** ------उत्तरवादी.

***---विवेचन---***

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये श्री. कमलाकर सुकदेव दरवडे, सरचिटणीस महाराष्ट्र ओ.बी.सी.संघ, मुंबई यांनी जनमाहिती अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त यांचेकडे दि. ५/८/२००६ रोजी अर्ज सादर करुन अंमलबजावणी शाखेतील पेट्रोलियम पदार्थाचे व्यापा-यांची माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नाही त्यामुळे व्यथित होवून अपीलकाराने दि. ३०/११/२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २६ मे, २००८ रोजी दुपारी १-०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री. अशोक पाटील विक्रीकर सहआयुक्त अंमलबजावणी (ड), मुंबई जनमाहिती अधिकारी श्री. जी.एन.परब, सहायक विक्रीकर आयुक्त तसेच अपीलकार श्री.कमलाकर सुकदेव दरवडे हे हजर होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपीलकाराने माहितीच्या अधिकारात जनमाहिती अधिका-याकडे दि. ५/८/२००६ रोजी विहित नमुन्यात अर्ज करुन पेट्रोलियम पदार्थाचे व्यापा-यासंबंधी एकूण १० मुद्दयांबाबत माहिती मागितली होती. अर्जातील मुद्दा क्र. १ ते ५ बाबतची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (एच) अनुसार माहिती देता येत नाही. अर्जातील मुद्दा क्र. ६ ते ८ ची माहिती विक्री उपआयुक्त, मुंबई नगर विभागाच्या कार्यालयाशी संबंधीत नाही. अर्जातील मुद्दा क्र. ९ व १० माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (एच) अनुसार सदर माहिती देता येत नाही असे अर्जदारास स्वीय सहायक ,विक्रीकर आयुक्त, मुंबई नगर विभाग (अमलबजावणी) मुंबई यांनी अपीलकारास कळविले आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१)अन्वये प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १५/९/२००६ रोजी अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलाची सुनावणी दि. २३/८/२००६ रोजी सकाळी ११-३० वाजता आयोजित केली. सुनावणीच्या वेळी अपीलकाराने लेखी निवेदन सादर केले.

अर्जातील मुद्दा क्र. ३(१), ३(२), ३(३),३(६), ३(७), ३(८) व ३(९) संबंधी जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर कायम केले. मुद्दा क्र.३(४) च्या संदर्भात माहिती अधिका-यांचा आदेश रद्दबातल करण्यात येवून अर्जदारास पुन्हा सुनावणी देण्यात यावी व कायद्यानुसार योग्य तो निर्णय घ्यावा असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४/९/२००६ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाने व्यथित होवून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०/११/२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

अपीलकाराच्या अर्जातील मुद्दा क्र.३(४) बाबत प्रथम अपिलीय अधिका-यांनी दिलेल्या आदेशानुसार जनमाहिती अधिका-यांनी कार्यवाही करावी. मुद्दा क्र. ३(५) बाबत अर्जदारास माहिती देण्यात आली आहे. मुद्दा क्र. ३ (१) (२) (६) (७) बाबतची माहिती तपासाधीन असणा-या प्रकरणांच्या संदर्भातील असल्याने अपीलकारास माहिती दिलेली नाही. अर्जातील मुद्दा क्र. ३(३) (८) (९) बाबतची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी जनमाहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविल्यानुसार त्यांनी संबंधितांकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

अपीलकाराने विचारलेली कांही माहिती विशिष्ट स्वरुपाची नाही. जनमाहिती अधिका-यांनी कांही माहिती प्रकरणे तपासाधीन असल्यामुळे नाकारली आहे. उपलब्ध माहिती अपीलकाराला दिली आहे. या सर्व बाबीचा साकल्याने विचार करता जन माहिती अधिका-याकडून अपेक्षित असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २७/५/०८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.रामाआ-२००८/१३८६३/अपील- १४७/०२**

**श्री.विकास सुधाकर हरियाण ------अपीलार्थी**
**लखमा जानू खोत चाळ, न्यू आग्रीपाडा,**
**सांताक्रुझ (पूर्व) मुंबई - ४०० ०५५.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी**
**समादेशक होमगार्ड बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने सचिवालय, जोड इमारत,**
**२ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ३२**

**जनमाहिती अधिकारी**
**समादेशक होमगार्ड बृहन्मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने सचिवालय, जोड इमारत,**
**२ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई - ३२ ------उत्तरवादी.**

***---विवेचन---***

श्री.विकास सुधाकर हरियाण यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये जन माहिती अधिकारी तथा (प्रशासकीय अधिकारी) समादेशक होमगार्ड बृहन्मुंबई यांचेकडे दि. ११/१०/२००६ रोजी अर्ज करुन ७ मानसेवी अधिकारी यांचे दहावी उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-याने दि. १२/११/२००६ च्या पत्रान्वये अपुरी माहिती दिल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. १३/११/२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संपूर्ण माहिती दिली नसल्यामुळे व्यथित होवून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपीलावर दि. ३०/५/२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी डॉ. हेमंत गायकवाड, समादेशक होमगार्ड, बृहन्मुंबई, जन माहिती अधिकारी श्री. स.रु सैदने, प्रशासकीय अधिकारी तसेच अपीलकार श्री.विकास सुधाकर हरियाण हे हजर होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून व अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपीलकार श्री.विकास सुधाकर हरियाण यांनी शासकीय माहिती अधिकारी, समादेशक होमगार्ड बृहन्मुंबई यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये अर्ज सादर करुन एकूण ७ मानसेवी अधिका-यांचे दहावी उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि. १०/११/२००६ च्या पत्रान्वये उपलब्ध माहिती अपीलकारास दिली.

जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. १३/११/२००६ रोजी प्रथम अपील सादर केले. प्रथम अपिलीय अधिका-यानी अपीलकारास दि. १/१२/२००६ च्या पत्रान्वये मानसेवी अधिका-यांची माहिती दिली. श्री. के.आर.पटेल व श्री. एस.आर.सावंत यांचेकडून मागितलेली माहिती प्राप्त झालेली नाही. त्यांना पत्र पाठवून माहिती मागविली असल्याचे कळविले. यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

मानसेवी अधिकारी श्री. एस.आर.सावंत व श्री. के.आर.पटेल हे दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र धारण करत नसल्यामुळे त्यांना मानसेवी पदावरुन पदावन्नत करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी सांगितले.

अर्जदारास वस्तुस्थितीप्रमाणे माहिती देण्यात कुचराई झालेली दिसून येत नाही. अपीलकाराने उपस्थित केलेल्या मुद्दयाचे निराकरण झाले असल्यामुळे मी सदर प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>***---आदेश---***</u>

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक २९/५/०८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-१४५/०२**

श्री. दत्तू रामजी खारवी ------अपीलार्थी
पंचम यादव चाळ, रूम नं.५७,
मालपा डोंगरी नं.३, महाकाली रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०० ०९३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------उत्तरवादी.
तहसिलदार यांचे कार्यालय,
दादाभाई नौरोजी,
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८.

२. जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार यांचे कार्यालय,
दादाभाई नौरोजी,
अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५८.

---- वि वे च न ---

श्री. दत्तू रामजी खारवी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अनुसार जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, अंधेरी, दादाभाई नौरोजी रोड, अधेरी (प.) यांचेकडे दि.२१.९.२००५, ७.८.२००६ च्याअर्जान्वये मौ.मजास, मुळगांव, कोंदिवीटा, ता.अंधेरी येथील जमिनीचे ७/१२, ६/१२ पीक पहाणीच्या नोंदीसह मागितले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलकारास माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.४.९.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावाी दि.३०.५.२००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री.डी.आर.कोळी, अव्वल कारकूर, जन माहिती अधिकारी श्रीमती मनिषा दोवंदे, तहसिलदार, अधेरी हे हजर होते. अपिलकार सुनावणीकरिता हजर नव्हते.

अपिलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. दत्तू रामजी खारवी यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि. २३.९.२००५ च्या अर्जान्वये मौ.मजास, ता.अधेरी येथील सर्वे नं.३७, ४२/५ पै, ४१, ४०/२ पै. जमिनीचे ७/१२, ६/१२, मौ.मुळगांव, ता.अधेरी येथील सर्वे नं.७४/८, ५/८, ५/२, २३/२, २०, ५३, ६०/२, ६०/५, ५९/१०, ५९/३, ५८/१२, ५८/१७, ५८/४, ५७/४, ६३/१, ६४/६, ७४/१ या जमिनींचे ७/१२, ६/१२ तसेच मौ. कोदिवीटा, ता.अधेरी येथील सर्वे नं.८/६, ८४/२, ४/१०, ८५/१२ जमिनीचे ७/१२, ६/१२ पीक पहाणीच्या नोंदीसह देण्याची मागणी केली होती. संबंधित तलाठी, जन माहिती अधिका-यांनी आज या उदया या, पेपर सापडले नाहीत अशी उत्तरे देवून माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे व्यथित होवून अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले.

सदर अपिलाचे सुनावणीच्यावेळी अपिलीय अधिकारी/जन माहिती अधिकारी यांनी लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी अर्जदार यांनी त्यांना कोणत्या सर्वे नंबरचे व कोणत्या गावचे ७/१२ व ६/१२ हवे आहेत हे अर्जामध्ये नमूद केलेले नाही. मंडळ अधिकारी यांच्या अहवालानुसार अर्जदारास कागदपत्रे उपलब्ध करून घेण्याबाबत प्रत्यक्ष जागेवर कोतवाल हे त्यांच्या नमूद पत्त्यावर गेले असता त्यांना संबंधित तलाठयाकडून कागदपत्रे त्वरित उपलब्ध करून घेण्याची समज देण्यात आली. त्यानुसार श्री.खारवी तलाठी कार्यालयात हजर झाले. त्यावेळी त्यांनी जमिनीचा तपशील देण्यास नकार दिला. अर्जदार यांना कोणते ७/१२ उतारे पीक पहाणीसहित ६/१२ उता-याची आवश्यकता आहे याबाबत अर्जदार यांचेकडून योग्य ते सहकार्य न मिळाल्याने सदर प्रकरणी योग्य कार्यवाही करता आली नाही.

वरील परिस्थितीत असे दिसून येते की, अपिलकार यांनी केंद्रिय माहितीचा अधिकारी अधिनियम, २००५ मधील कलम ६ अन्वये मौ.कोंदावीटा, मौ.मजास व मौ.मुळगांव, ता.अधेरी येथील वर नमूद केलेल्या सर्वे नंबरचे ७/१२, ६/१२ पीक पहाणीच्या नोंदीसह माहिती मिळण्याबाबत अर्ज करून मागणी केली होती. सदर अर्ज तहसिलदार, अंधेरी कार्यालयातील

अभिलेख कक्षात श्री.हिर्लेकर यांनी आरइव्ही क्र. १८०७/०५, १८०८/०५ व १९०८/५ अन्वये दि. १६.१२.२००५ रोजी स्वीकारले असल्याचे स्पष्ट दिसून येते.

अर्जदाराच्या मागण्यांचा योग्य प्रकारे विचार न करता त्यांच्या मागण्या फेटाळण्यात आल्या आहेत असे दिसून येते. राज्य माहिती आयोगाने पाठविलेल्या श्री.खारवी यांच्या दि.४.९.२००६ च्या अपील अर्जात कोणत्या जमिनीच्या ७/१२ व ६/१२ उता-याची आवश्यकता आहे याबाबत अपिलकाराने माहिती दिलेली नाही. म्हणून जन माहिती अधिका-याने कोतवालास अपिलकाराच्या राहत्या घरी जावून त्यांना समज दिल्याचे जन माहिती अधिका-याने सुनावणीच्यावेळी सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. ही एक गंभीर बाब आहे. अपिलकाराने तहसिलदार, अंधेरी कार्यालयात सादर केलेल्या अर्जानुसार माहिती न देता अर्जदारास त्यांचे घरी जावून समज देणे ही कृती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करणारी आहे. या प्रकरणी मी जन माहिती अधिका-यांना असे आदेश देतो की, अपिलकारास मागणीनुसार आवश्यक ती संपूर्ण माहिती २० दिवसांचे आत मोफत दयावी. केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करावा.

सबब मी खालीलप्रमाणे निणर्य देत आहे.

- आ दे श --

अपील मान्य करण्यांत येत आहे.

( रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक :-३१.०५.२००८.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**क्र.रामाआ-२००८/१३८७०/अपील- १०७/०२**

**श्री. प्रदिप बी. अग्रवाल** **------अपीलार्थी**
**सी १/१७, पंचशील बिल्डींग,**
**जे.बी.नगर, अंधेरी (पूर्व) मुंबई ५९.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ ईस्ट वॉर्ड,**
**अंधेरी (पूर्व) मुंबई - ६९.**

**२. जनमाहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, के/ ईस्ट वॉर्ड,**
**अंधेरी (पूर्व) मुंबई - ६९.** **------उत्तरवादी.**

***---विवेचन---***

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये श्री.प्रदिप बी.अग्रवाल यांनी दि. १ ऑगस्ट, २००६ रोजी जन माहिती अधिकारी तथा श्री. कि.ह.पंचाल ,प्रकल्प अधिकारी, के/पूर्व विभाग यांचेकडे अर्ज सादर करुन सहजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पात्र करण्यात आलेल्या झोपडपट्टी धारकांची संपूर्ण यादीची व पुराव्याचा तपशील परिशिष्ट-२ मध्ये एस.आर.ए. योजनेसाठी सादर केला आहे त्याच्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली . त्यामुळे व्यथित होवून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ पोटकलम (३)अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर अपीलावर सुनावणी दि. ३०/५/२००८ रोजी दुपारी १-१५ वाजता आयोजित करण्यात आली होती. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री. रणजीत भू. ढाळे, सहायक आयुक्त के/पूर्व विभाग, जनमाहिती अधिकारी तथा श्री. की.ह. पंचाल, प्रकल्प अधिकारी के/पूर्व विभाग हे हजर होते. अपीलकार सुनावणीसाठी हजर नव्हते.

सदर सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांचा युक्तीवाद ऐकून अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

श्री.प्रदिप बी.अग्रवाल, अपीलकार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, के/पूर्व विभाग ,बृहन्मुंबई महानगरपालिका गुंदवली व्हिलेज, अंधेरी (पूर्व) येथील सहजीवन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झ ोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत पात्र करण्यात आलेल्या सर्व झोपडपट्टीधारकांची संपूर्ण यादीची तसेच पुराव्याचा तपशील परिशिष्ट-२ ची झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देणेबाबत दि. १/८/२००६ रोजी अर्ज करुन मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी के/पूर्व विभाग यांनी, एस.आर.ए. या योजनेखाली पात्र करण्यात आलेल्या झोपडपट्टीधारकांची संपूर्ण यादी व पुराव्याचा तपशील परिशिष्ट-२ च्या झेरॉक्स प्रतीसाठी एकूण रु. १०/- शुल्क ७ दिवसाचे आंत मुख्य लिपीक महसूल खाते के/पूर्व विभाग यांचे कार्यालयात भरुन त्याची प्रत प्रकल्प अधिकारी के/पूर्व यांचे कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावी. अन्यथा आपला अर्ज दप्तरी दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी के/पूर्व विभाग यांनी दि. ३१/८/०६ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले होते.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हवी असलेली माहिती दिली नाही. चुकची पुराव्याचा तपशील परिशिष्ट-२ ची नको असलेली माहिती दिली. एस.आर.ए. योजनेखाली सदनिका प्राप्त करुन घेण्याकरिता लोकांनी पुरावा म्हणून सादर केलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती अर्जदारास हव्या आहेत. त्या प्राप्त झाल्या नाहीत यामुळे व्यथित होवून अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. २०/९/२००६ रोजी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ पोटकलम १ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री. रणजित धकाने, महानगरपालिका सहायक आयुक्त, के/पूर्व यांनी त्यांचे दालनात दि. ५/१२/२००६ रोजी सायंकाळी ४-०० वाजता सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीकरीता अपीलकार हजर नव्हते. श्री.पांचाळ, प्रकल्प अधिकारी आणि कॉलनी

ऑफिसर हजर होते. दोघांचे म्हणणे ऐकून घेवून पुढीलप्रमाणे दि. ५/१२/२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले.

"झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंअंतर्गत ज्या लाभधारकांनी निवासाच्या पुराव्यासंबंधी कागदपत्रे दिली आहेत व त्याचा परिशिष्ट-२ मध्ये समावेश करण्यात आला आहे त्यासंबंधीच्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती अपीलकारास तात्काळ उपलब्ध करुन द्याव्यात."

अपूर्ण माहिती उशिराने दिली. निवासाच्या पुराव्याच्या आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रती दिल्या नाहीत. संस्थेचे ५७ सदस्य आहेत. त्यापैकी ४२ सदस्यांचे निवासाचे पुराव्याच्या प्रती दिल्या. १५ सदस्यांचे निवासाचे पुराव्याच्या प्रती दिल्या नाहीत. म्हणून जन माहिती अधिका-यांना दंडीत करण्याबाबत अपीलकाराने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ पोटकलम (३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील सर्व बाबीचा साकल्याने विचार करता अर्जदारास वस्तुस्थितीप्रमाणे उपलब्ध माहिती देण्यात कुचराई झालेली दिसून येत नाही. अर्जदार सुनावणीकरिता हजर नव्हते. कदाचित त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाली असावी म्हणून ते सुनावणीसाठी हजर नव्हते.

सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक ३०/५/०८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.रामाआ-२००८/१३८२५/अपील- १०२/०२**

**श्री.चंद्रशेखर भाऊसाहेब ढोबळे ------अपीलार्थी**
**२८, जंजीकर स्ट्रीट, मांडवी ढोबळे बिल्डींग,**
**३ रा मजला, खोली क्र.३६, मुंबई - ३**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक**
**भूमी अभिलेख (दशमान), पुणे.**

**२. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक**
**भूमी अभिलेख जुन्नर (दशमान) जि. पुणे. ------उत्तरवादी.**

***---विवेचन---***

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये श्री.चंद्रशेखकर भाऊसाहेब ढोबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर (दशमान)जि.पुणे यांचेकडे दि. १३/६/२००६ रोजी अर्ज सादर करुन गाव माणिकडोह, ता.जुन्नर, जि.पुणे येथील शेतजमिन सर्व्हे नं.२५ (गट नं.७४) बाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-याने दि. १३/७/२००६ च्या पत्रान्वये सर्व्हे नं.२५, उतारा अभिलेखात शोध घेतला असता सदर सर्व्हे नंबरचे टिप्पण आढळ होत नाही असे अपीलकारास कळविले. त्यामुळे व्यथित होवून अपीलकाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१)अन्वये प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. १०/८/२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांचेसमोर दि. ४/९/२००६ रोजी दुपारी ३-३० वाजता सुनावणी आयोजित केली होती. श्री. गि.ह. राव, अपिलीय अधिकारी, अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांनी सुनावणी घेवून दि. २०/११/०६ रोजी आदेश पारित केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी पारित केलेल्या आदेशाने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)अन्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर

अपीलावर सुनावणी दि. ३० मे, २००८ रोजी  दुपारी १-३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी श्री. गिरीश राव,  अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे, जनमाहिती अधिकारी श्रीमती.  प्र.मो. लोहकरे, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, जुन्नर हे तसेच अपीलकार श्री.चंद्रशेखर भाऊसाहेब ढोबळे  हजर होते.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून प्रथम अपिलीय अधिका-यांनी  सुनावणीच्या वेळी दिलेला लेखी खुलासा व अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट
झाल्या.

अपीलकार श्री.चंद्रशेख भाऊसाहेब ढोबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर यांचेकडे दि. १३/६/२००६ रोजी अर्ज सादर करुन गाव माणिकडोह,ता.जुन्नर येथील सर्वे नं.२५ (गट नं.७४ )येथील त्यांच्या शेतजमिनीच्या ७/१२ च्या उता-यावर सन १९६७-६८ साली त्याचे क्षेत्र  ११ एकर ३१ गुंठे वरुन १० एकर  ४ गुंठे करण्यात आले आहे. सन १९६७-६८ पूर्वी रुपये आणे, पैसे व एकर गुंठे परिमाणात नोंद होत्या.  नवीन दशमान पध्दतीत हेक्टर, आर व रुपये पैसे परिमाणात रुपांतर करतांना बदल झ ाालेले आहेत.   गटवारीचे आदेश जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख (दशमान) पुणे या कार्यालयाकडील आदेशान्वये झाले आहेत.    तरी याकामी देण्यात आलेल्या आदेशाची प्रत मिळण्याबाबत मागणी केली होती.

जनमाहिती अधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१)अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा श्री. गिरीश राव, अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे यांचेकडे दि. १०/८/२००६ रोजी प्रथम अपील दाखल करुन माणिकडोह ,ता.जुन्नर येथील सर्व्हे नं. २५ (गट ७४) बाबत माहिती मागितली.  प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४/९/२००६ रोजी अपीलावर सुनावणी घेवून पुढीलप्रमाणे आदेश पारित केले.

"भूमी अभिलेख विभागाकडून मूळ भूमापन झाल्यानंतर क्षेत्राच्या तपशिलासाठी  आकारबंद तयार केला जातो.  त्या आकारबंदाच्या आधारे गांवी  अधिकार अभिलेखास (सद्याचे ७/१२ उता-यास)महसूल विभागाकडून अमल घेतला जातो.  भूमी अभिलेख विभागाकडून तयार केलेल्या

आकारबंदाप्रमाणे गावचे अधिकार अभिलेखास म्हणजे ७/१२ स क्षेत्र दाखल होणे अभिप्रेत आहे. तथापि, मूळ भूमापनाप्रमाणे तयार झालेल्या आकारबंदातील सर्व्हे नं. २५ चे क्षेत्र १० एकर ४ गुंठे असतांना ते गावचे अधिकार अभिलेखावर ११ एकर ३१ गुंठे कसे लागले याची तपासणी महसूल विभागाकडून म्हणजे तहसिलदार जुन्नर यांचेकडून होणे आवश्यक आहे. कारण तोपर्यंत मूळ आकारबंदाचे नमुद क्षेत्रात कोणत्याही सक्षम अधिका-याचे आदेशाने बदल होत नाही. तोपर्यंत त्या सर्व्हे नंबरचे क्षेत्र हे आकारबंदाप्रमाणेच अधिकार अभिलेखास म्हणजे ७/१२ उता-यास नमुद असणे कायद्याने अभिप्रेत आहे. मुळ भूमापन झाल्यानंतर आकारबंदाचा गावी अमल घेतांना महसूल अधिका-याकडून अधिकार अभिलेखात क्षेत्र दाखल करणेत चूक झाली असावी असे सकृतदर्शनी दिसते. त्याचे एक कारण खराब्याचे क्षेत्र दुबार धरले असण्याची शक्यता आहे. याची पडताळणी जुने ७/१२ चे उतारे अगर तत्पूर्वीचे अभिलेख पाहून महसूल विभागाकडून होणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख विभागाकडून दशमान रुपांतर करतांना अपीलदाराचे शेतजमिनीचे क्षेत्र कमी झालेले नाही असे पडताळणी अंती दिसून येते. अपीलदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीचा वापर करुन त्या अनुषंगाने अर्ज करुन दाद मागून घेणे उचित होईल. "

अपीलकार यांना अधीक्षक भूमी अभिलेख तथा प्रथम अपिलीय अधिका-यांनी योग्य ती माहिती दिली असल्याचे दिसून येते. अपील अर्जावर दिलेले उत्तर हे समर्पक व नियमानुसार असल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## ***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

मुंबई
**दिनांक ३०/५/०८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.रामाआ-२००८/१३९००/अपील- १०५/०२**

**श्रीमती लक्ष्मी नारायण अडवळ** **------अपीलार्थी**
**अडवळ प्लॉट, मुलुंड (पूर्व) गोखले मार्ग,**
**मुलुंड (पूर्व) मुंबई ८१.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त परि-६**
**बृहन्मुंबई महानगरपालिका एन विभाग, जवाहर रस्ता,**
**घाटकोपर (पूर्व) मुंबई ७७**

**२. जनमाहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**बृहन्मुंबई महानगरपालिका इमारत, टी विभाग,**
**लाला देवीदयाळ मार्ग, मुलुंड (पश्चिम) मुंबई ८०** **------उत्तरवादी.**

## ***---विवेचन---***

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ अन्वये श्रीमती लक्ष्मी नारायण अडवळ यांनी जनमाहिती अधिकारी तथा श्री. पराग मसूरकर, सहायक आयुक्त यांचेकडे दि. ९/८/२००६ रोजी अर्ज करुन श्री.नाईक यांच्या जमीन संपादनाच्या बाबतीत माहिती मागितली . जनमाहिती अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे व्यथित होवून अपीलकारानी दि. ३/१०/२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुंबई महानगरपालिका उपआयुक्त, परिमंडळ ६ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/अपिलीय अधिका-यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि. ७/१२/२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी दि. २१/५/२००८ रोजी दुपारी ४-३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरीता जनमाहिती अधिकारी तथा श्री. प.र.मसूरकर, सहायक आयुक्त टी- विभाग हे हजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपीलकार श्रीमती.लक्ष्मी नारायण अडवळ उपस्थित नव्हते.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणणे ऐकून तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

अपीलकार श्रीमती. लक्ष्मी नारायण अडवळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार श्री. नाईक यांची नियम रेषेप्रमाणे गोपाळ कृष्ण गोखले मार्गाच्या रस्ता रुंदीकरणामध्ये येणारी जमिन किती चौरस मीटर संपादीत करावयाची आहे. महानगरपालिकेने जनहितासाठी संपादीत केलेली जमिन श्री.नाईक यांना परत करु शकत नाही. यासाठी जाहीर नोटीस देणे आवश्यक आहे. अशी नोटीस दिली असल्यास नोटीसीची प्रत उपलब्ध करुन देणेबाबत अर्ज सादर करुन माहिती मागितली होती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ५(१)नुसार सहायक आयुक्त "टी " विभाग यांना जन माहिती अधिकारी घोषीत करण्यात आले आहे. म्हणून अपीलकारांचा अर्ज जन माहिती अधिका-याकडे पाठविला असल्याचे महापालिका आयुक्तांच्या चिटणीसानी अपीलकारास दि. २५/८/२००६ च्या पत्रान्वये कळविले.

वरिल परिस्थितीत मी असे आदेश देत आहे की, जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त "टी " विभाग, लाला देवीदयाळ मार्ग, मुलुंड (पश्चिम) यांनी अपीलकारास आवश्यक ती माहिती ३० दिवसाचे आत उपलब्ध करून द्यावी.

***---आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई ,**
**दिनांक ३०/५/०८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-१२५/०२**

**श्री. के.के.बापर्डेकर,** **------अपीलार्थी**
**२/३३, मयुर सोसायटी, चाळ नं.२,**
**कॉलेज लेन, दादर, मुंबई- ४०० ०२८.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३,**
**बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई - ४०० ०२७.**

**२. जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष,**
**बावला कंपाऊंड,**
**भायखळा, मुंबई - ४०० ०२७.** **------उत्तरवादी**

**---- वि वे च न ---**

**केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अनुसार श्री.के.के.बापर्डेकर यांनी दि.१६.६.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई यांचेकडे पोलिसांनी केलेल्या चौकशीचा अहवाल, जाबजबाबाच्या प्रमाणित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.३०.५.२००८ रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या वतीने श्री.शा.स.शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक, जन माहिती अधिकारी तथा श्री.एन.टी.शेख, सहायक पोलीस आयुक्त, तसेच अपिलकार श्री.के.के.बापर्डेकर हजर होते.**

**दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.**

अपिलकार श्री. बापर्डेकर यांनी केंद्रिय माहितीच्या अधिकारात दि.१६.६.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई यांच्याकडे पुढील माहिती मागितली होती.

१) अर्जदार श्री.बापर्डेकर यांच्या विरूध्द नोंदविलेल्या गुन्हयात केलेले आरोप व त्याबाबत पोलीसांनी केलेला तपास.

२) मा.उच्च न्यायालयातील क्रिमीनल ॲप्लीकेशन क्र.४३८२/४, ऑर्डरची प्रमाणित केलेली छायांकित प्रत.

३) श्रीमती वंदना महादेव तरे यांच्या जबाबाची प्रमाणित केलेली छायांकित प्रत.

४) वर नमूद गुन्हयाचा तपास मा.कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे करण्याबाबत अर्ज केलेला आहे. सदर अर्जाची प्रत.

५) गु.र.क्र.१५४/०५ हा "क " समरीसाठी पाठविला त्याची प्रत.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकार श्री.बापर्डेकर यांनी विकासक श्री. प्रदीप शहा व वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सोसायटी यांच्या विरूध्द फसवणूकीचा गुन्हा नोंद क्र.१५४/०५ करण्यात आला. विकासक श्री. प्रदीप शहा व अपिलकार श्री. बापर्डेकर यांनी एकमेकांविरूध्द आरोप प्रत्यारोप करून न्यायालयात व पोलीस ठाण्यात दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या तक्रारी दाखल केल्या. वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे श्री.नारायण मढावी यांनी अपिलकार श्री.बापर्डेकर यांचे विरूध्द दादर पोलीस ठाण्यात एमईसीआर क्र.०२/२००५, कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ सह १२० (ब) भा.द.वि.प्रमाणे गुन्हा दाखल केला. आरोपी श्री.प्रदीप दलचंद शहा यांनी मा.उच्च न्यायालयात क्रिमीनल ॲप्लीकेशन क्र.४३८२/०४दाखल केला. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने **"contraversis really in the nature of civil disputes "** असे म्हटले.

सदर गुन्हया संदर्भात सरकारी अभियोक्ता बृहन्मुंबई यांनी **"According to me it is the civil matter & no offence punishable U/S ४२० r/w ३४ of I,P,C, is warranted "** असे अभिप्राय दिले. फिर्याद ही दिवाणी स्वरूपाची असल्याचे निष्पन्न झाल्याने " दिवाणी बाब

" समरी मंजूर होणेकामी कागदपत्रे मा.अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ५ वे न्यायालय, दादर, मुंबई, यांचेकडे जन माहिती अधिका-यांनी दि. ३.३.२००६ रोजी सादर केली.

पोलीस गुन्हयाच्या तपासकामी निष्क्रिय आहेत व ते आरोपीच्या बाजूने तपास करतात असे अपिलकार श्री.बापर्डेकर यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.२३५/०६ दाखल केली. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने सदर गुन्हयातील दस्तऐवजाबाबत केलेल्या अफरातफरीचा रितसर तपास करण्या बाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे मा.अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात समरी मंजुरीसाठी पाठविलेली कागदपत्रे परत घेवून या प्रकरणी तपास करण्यात येत असल्याचे दि.३०.५.२००८ रोजी सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले आहे.

गुन्हयातील दस्तऐवजाबाबत केलेल्या अफरातफरीचा रितसर तपास करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. अपिलकाराच्या मागणीप्रमाणे गुन्हयातील कागदपत्रांच्या प्रती अपिलकारास उपलब्ध करून दिल्यास तपासात अडचणी येवू शकतात. त्याचप्रमाणे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर बाबी लक्षात घेता तपासाधीन गुन्हयातील कागदपत्राच्या प्रती अपिलकारास न देण्याची जन माहिती अधिका-याने घेतलेली भूमिका योग्य वाटते.

सबब वरील परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***- आ दे श --***

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

( रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक :-०२.०६.२००८.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिायिम २००५ मधील कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१४४/०२**

**श्री. अर्जुन टी. हसरजानी,** **------ अपीलकर्ता**
**एफ ६०१-२ ब,**
**अपना घर को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.**
**५ वा मजला, डी. ग्रूप, शिवाजीनगर,**
**जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०.**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य आस्थापना अधिकारी,**
**वरिष्ठ आस्थापना अधिकारी,**
**आस्थापना विभाग,**
**बी. ई.एस.टी.उपक्रम, बेस्ट भवन,**
**बेस्ट मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य आस्थापना अधिकारी,**
**वरिष्ठ आस्थापना अधिकारी,**
**आस्थापना विभाग,**
**बी. ई.एस.टी.उपक्रम, बेस्ट भवन,**
**बेस्ट मार्ग, मुंबई- ४०० ००१.**

**-----उत्तरवादी**

- **वि वे च न-**

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम (६) अन्वये श्री. अर्जुन टी. हसरजानी, यांनी जन माहिता अधिकारी तथा श्री. ए.वाय. वालावलकर, वरिष्ठ आस्थापना अधिकारी, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, मुंबई यांचेकडे दि. ८.२.२००६ रोजी अर्ज करुन त्यांच्या निवेदनावर विविध अधिका-यांनी केलेल्या टिप्पणीची प्रत देणेबाबत मागणी केली होती. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याकारणााने जन माहिती अधिका-याने माहिती नाकारली. त्यामुळे व्यथित होऊन अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि. १३.६.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलकाराने केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.८.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी हजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी तसेच अपिलकार हजर नव्हते.

सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील गोष्टी स्पष्ट झाल्या.

श्री. अर्जुन टी. हसरजानी, अपिलकार यांनी माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिका-याकडे दि.८.२.२००६ रोजी अर्ज करुन श्री. हुसेन दलवाई, मा. खासदार यांनी अपिलकाराने निवेदााबाबत मा. मुख्यमंत्री यांना दि. ३.१२.२००४ च्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत विनंती केली होती. नगर विकास विभागाकडून सदर निवेदााबाबत परिक्षण करुन अर्जदारास उत्तर पाठविण्याबाबत बेस्ट उपक्रमास कळविण्यांत आले होते. बेस्ट उपक्रमातील अ श्रेणी अधिका-यासाठी असलेल्या साखळी पदोन्नतीच्या धोरणास आव्हान देण्यासाठी श्री. सुहास नलावडे, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी (वि.पु.) यांनी उपक्रमाविरुध्द उच्च न्यायालयाकडे धाव घेतली आहे. सदर दावा उच्च न्यायालयाने सुनावणीसाठी दाखल करुन घेतला आहे. यास्तव अपिलकाराने निवेदाात उपस्थित केलेल्या मुद्याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याकारणामुळे माहिती देण्याचे नाकारले आहे.

जन माहिती अधिका-यांनी अर्जदारास प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे माहिती देण्याचे नाकारल्यामुळे व्यथित होऊन दि. १३.६.२००६ रोजी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-याने सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नााही. त्यामुळे अपिलकारानें राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.८.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक महाव्यवस्थापक (कर्मचारीय) श्री. सुहास नलावडे यांनी वैयक्तिक स्वरुपात दि. २५.४.२००८ रोजी अपिलकारास माहिती दिलेली असल्याचे श्री.र.ज.धर्णे, वरिष्ठ कर्मचारीय अधिकारी, बेस्ट यांनी सुनावणीच्यावेळी सांगितले.

पूर्ववर्ती विवेचनाच्या आषुंगाने खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश -**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**( रामानंद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त,बृहमुंबई**

**मुंबई**
**दिांक :-३१/०५/२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग , बृहमुंबई खंडपीठ महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क.२००८/१४८/०२**

**श्री.कमलाकर सुखदेव दरवडे,**
**सरचिटणीस महाराष्ट्र ओ.बी.सी. संघ,**
**दरवडे चाळ, व्ही.एस.मार्ग ,**
**साया चुनाभट्टी , मुंबई-४०० ०२२** **------ अपीलकर्ता**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विक्रीकर सहआयुक्त**
**अंमलबजावणी अ ४था मजला विक्रीकर भवन,**
**माझगांव मुंबई -१०**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक विक्रीकर आयुक्त**
**(अवेषण) अ ४था मजला विक्रीकर भवन**
**माझगांव मुंबई -१०** **-----उत्तरवादी**

**- वि वे च न -**

श्री.कमलाकर सुखदेव दरवडे , मुंबई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली दि. ७/७/२००६ च्या अजार्न्वये पेट्रोलियम पदार्थाच्या बाबतीत विक्रीकर विभागाकडून देण्यात आलेले जप्तीचे , मुक्ततेचे आदेश या बाबीशी संबंधित आुषंगिक माहिती, विक्रीकर खात्यातील अधिका-यांची कार्यप्रणाली, अंमलबजावणी शाखेतील अधिका-यांच्या बदल्या इ.बाबींची माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या आुषंगाने जनमाहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकाराने प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील दाखल केले .तथापि प्रथम अपीलीय प्राधिका-यांने पारित केलेल्या आदेशानेही समाधान न झाल्याने अपीलकाराने आयोगाकडे व्दीतीय अपील दाखल केले, ज्याची सुनावणी दि.२६ मे २००८ रोजी आयोजित करण्यात आली . सदर सुनावणीला अपीलकार, जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय प्राधिकारी उपस्थित होते.

उपलब्ध कागदपत्राची तपासणी केली असता व दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अर्जदाराने केलेल्या अर्जाच्या आषुंगाने जन माहिती अधिका-यांनी अर्जदाराला त्यांच्या दि. ३१/७/२००६ च्या पत्रान्वये माहिती पुरवली आहे. त्यामध्ये काही माहिती संदिग्ध असल्यामुळे तर काही माहिती अधिनियमातील तरतूदीनुसार देता येत नसल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी नाकारली आहे व देता येण्याजोगी माहिती अर्जदाराला उपलब्ध करून दिली आहे. प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी संदिग्ध माहिती असलेल्या मुद्दयांबाबतची माहिती देता येईल किंवा कसे ही बाब जन माहिती अधिका-यांनी पुन्हा तपासून पहावी असे आदेशात नमूद केले आहे. त्याखेरीज जन माहिती अधिका-यांची या संदर्भातील भूमिकेशी सहमत असल्याचे प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे.

अपीलकाराने विशिष्ट अशी माहिती मागितलेली नाही. तथापि जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. विचारलेल्या माहितीचे मोघम स्वरूप पाहता तसेच जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती दिलेली आहे. हे लक्षात घेता प्रथम अपीलीय प्राधिका-यांनी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगाला आवश्यकता वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे

**आदेश**

**अपील ाकाली काढण्यात येत आहे.**

**( रामाांद तिवारी )**
**राज्य माहिती आयुक्त, बृहमुंबई**

**मुंबई**
**दिाांक :-२९/५/२००८**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र-२००८/अपील-१२५/०२**

श्री. के.के.बापर्डेकर, ------अपीलार्थी
२/३३, मयुर सोसायटी, चाळ नं.२,
कॉलेज लेन, दादर, मुंबई- ४०० ०२८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३,
बावला कंपाऊंड, भायखळा, मुंबई - ४०० ०२७.

२. जन माहिती अधिकारी तथा
सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष,
बावला कंपाऊंड, भायखळा, मुंबई - ४०० ०२७. ------उत्तरवादी

## ---- वि वे च न ---

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ अनुसार श्री.के.के.बापर्डेकर यांनी दि.१६.६.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई यांचेकडे पोलिसांनी केलेल्या चौकशीचा अहवाल, जाबजबाबाच्या प्रमाणित प्रतींची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती नाकारल्याने अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००६ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपिलाची सुनावणी दि.३०.५.२००८ रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिका-यांच्या वतीने श्री.शा.स.शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक, जन माहिती अधिकारी तथा श्री.एन.टी.शेख, सहायक पोलीस आयुक्त, तसेच अपिलकार श्री.के.के.बापर्डेकर हजर होते.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व अपिलातील कागदपत्रांची तपासणी केली असता खालील बाबी स्पष्ट झाल्या.

अपिलकार श्री. बापर्डेकर यांनी केंद्रिय माहितीच्या अधिकारात दि.१६.६.२००६ च्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, मध्य नियंत्रण कक्ष, मुंबई यांच्याकडे पुढील माहिती मागितली होती.

१) अर्जदार श्री.बापर्डेकर यांच्या विरूध्द नोंदविलेल्या गुन्हयात केलेले आरोप व त्याबाबत पोलीसांनी केलेला तपास.

२) मा.उच्च न्यायालयातील क्रिमीनल ॲप्लीकेशन क्र.४३८२/४, ऑर्डरची प्रमाणित केलेली छायांकित प्रत.

३) श्रीमती वंदना महादेव तरे यांच्या जबाबाची प्रमाणित केलेली छायांकित प्रत.

४) वर नमूद गुन्हयाचा तपास मा.कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे करण्याबाबत अर्ज केलेला आहे. सदर अर्जाची प्रत.

५) गु.र.क्र.१५४/०५ हा "क " समरीसाठी पाठविला त्याची प्रत.

अपिलकाराने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलकार श्री.बापर्डेकर यांनी विकासक श्री. प्रदीप शहा व वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सोसायटी यांच्या विरूध्द फसवणूकीचा गुन्हा नोंद क्र.१५४/०५ करण्यात आला. विकासक श्री. प्रदीप शहा व अपिलकार श्री. बापर्डेकर यांनी एकमेकांविरूध्द आरोप प्रत्यारोप करून न्यायालयात व पोलीस ठाण्यात दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या तक्रारी दाखल केल्या. वरळी कोळी समाज विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे श्री.नारायण मढावी यांनी अपिलकार श्री.बापर्डेकर यांचे विरूध्द दादर पोलीस ठाण्यात एमईसीआर क्र.०२/२००५, कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ सह १२० (ब) भा.द.वि.प्रमाणे गुन्हा दाखल केला. आरोपी श्री.प्रदीप दलचंद शहा यांनी मा.उच्च न्यायालयात क्रिमीनल ॲप्लीकेशन क्र.४३८२/०४दाखल केला. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने **"contraversis really in the nature of civil disputes "** असे म्हटले.

सदर गुन्हया संदर्भात सरकारी अभियोक्ता बृहन्मुंबई यांनी **"According to me it is the civil matter & no offence punishable U/S ४२० r/w ३४ of I,P,C, is warranted "**

असे अभिप्राय दिले. फिर्याद ही दिवाणी स्वरूपाची असल्याचे निष्पन्न झाल्याने " दिवाणी बाब " समरी मंजूर होणेकामी कागदपत्रे मा.अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ५ वे न्यायालय, दादर, मुंबई, यांचेकडे जन माहिती अधिका-यांनी दि. ३.३.२००६ रोजी सादर केली.

पोलीस गुन्हयाच्या तपासकामी निष्क्रिय आहेत व ते आरोपीच्या बाजूने तपास करतात असे अपिलकार श्री.बापर्डेकर यांनी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.२३५/०६ दाखल केली. यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने सदर गुन्हयातील दस्तऐवजाबाबत केलेल्या अफरातफरीचा रितसर तपास करण्या बाबत आदेश दिले आहेत. त्यामुळे मा.अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात समरी मंजुरीसाठी पाठविलेली कागदपत्रे परत घेवून या प्रकरणी तपास करण्यात येत असल्याचे दि.३०.५.२००८ रोजी सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी सादर केलेल्या लेखी अहवालात नमूद केले आहे.

गुन्हयातील दस्तऐवजाबाबत केलेल्या अफरातफरीचा रितसर तपास करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. या प्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे. अपिलकाराच्या मागणीप्रमाणे गुन्हयातील कागदपत्रांच्या प्रती अपिलकारास उपलब्ध करून दिल्यास तपासात अडचणी येवू शकतात. त्याचप्रमाणे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर बाबी लक्षात घेता तपासाधीन गुन्हयातील कागदपत्राच्या प्रती अपिलकारास न देण्याची जन माहिती अधिका-याने घेतलेली भूमिका योग्य वाटते.

सबब वरील परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## *- आ दे श --*

**अपील अमान्य करण्यांत येत आहे.**

( रामानंद तिवारी)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक :-०२.०६.२००८.